म. ग्रं. सं. ठाणें
विषय मु० प्रकरा
सं. क्र. २२

REFBK-0003233
REFBK-0003233

ग्रं. सं. ठाणे
२ — [illegible]
३
१५८२६

लेय पुस्तकमाला नं. १

# मुंबई इलाखा.

(हिंदुस्थानची सामान्य माहिती, पारिभाषिक व्याख्या व स्थलनामकोश यांसह).

अर्थात

# सुलभ भूवर्णन भाग १

(प्राथमिक मराठी चौथ्या इयत्तेकरितां)

लेखक व प्रकाशक,

के... आजरेकर.

हेडमास्तर ... बेळगांव.

REFBK-0003233

शामराव गोविंदराव देसाइ,
श्रीशिवाजी प्रिंटिंग प्रेस, बेळगांव.

सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन.

द्वितीयावृत्ति प्रती २०००

जून १९२६ ] राजशक २५३ [ ज्येष्ठ शके १८४८.

किंमत तीन आणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
मराठी ग्रंथ संग्रहालय
3233

# मुंबई इलाख्याची सामान्य माहिती.

१ **मुंबई इलाखा**—हिंदुस्थान द्वीपकल्पाच्या पश्चिमेकडील अरुंद पट्टीस 'मुंबई इलाखा' असें ह्मणतात.

२ **सीमा**—उत्तरेस पंजाब; पूर्वेस राजपुताना, मध्य हिंदुस्थान, मध्यप्रांत, वऱ्हाड आणि निजामचें राज्य; दक्षिणेस म्हैसूर संस्थान व मद्रास इलाखा, पश्चिमेस हालपर्वत व अरबीसमुद्र.

**क्षेत्रफळ**—१८८ हजार चौ. मैल. पैकीं संस्थानांत ६६ हजार चौ. मैल. **लोकसंख्या** २॥। कोटी. पैकीं संस्थानांत ७४ लक्ष. दक्षिणोत्तर **लांबी** १००० मैल. पूर्वपश्चिम रुंदी २०० मैल.

३ **देश** ह्मणजे सह्याद्रीच्या पूर्वेकडील प्रदेश. **कोंकण** ह्मणजे सह्याद्रीच्या पश्चिमेकडील अरुंद पट्टी. **देश** व **कोंकण** यांमध्यें सह्याद्रि आहे.

४ **स्वाभाविक विभाग** ६ आहेत. सिंध, कच्छ, गुजराथ, महाराष्ट्र दक्षिण महाराष्ट्र आणि कोंकण.

५ **राजकीय विभाग** ५ आहेत. सिंधप्रांत, उत्तरभाग, मध्यभाग, दक्षिणभाग आणि मुंबईभाग.

उत्तरभागास गुजराथ, मध्यभागास महाराष्ट्र, दक्षिणभागास दक्षिण महाराष्ट्र किंवा कर्नाटक अशीं नांवें आहेत.

गुजराथ व महाराष्ट्र यांमध्यें नर्मदा नदी असून महाराष्ट्र व कर्नाटक यांमध्यें कृष्णा नदी आहे.

मुख्य शहरें सिंधमध्यें कराची, उत्तरभागांत अहमदाबाद, मध्यभागांत पुणें, दक्षिणभागांत बेळगांव आणि मुंबईभागांत मुंबई.

६ **सिंधप्रांतांत** जिल्हे ७. कराची, हैद्राबाद, नबाबशाह, शिकारपूर, लारखाना, थर आणि पारकर व अप्परसिंध फ्रॉंटियर.

**उत्तरभागांत** जिल्हे ६ अहमदाबाद, खेडा, पंचमहाल, भडोच, सुरत आणि ठाणें.

**मध्यभागांत** जिल्हे ७. पूर्वखानदेश,पश्चिम खानदेश, नासिक, पुणें, अहमदनगर, सातारा आणि सोलापूर.

**दक्षिणभागांत** जिल्हे ६. बेळगांव, धारवाड, कारवार, विजापूर, कुलाबा आणि रत्नागिरी.

**मुंबईभाग** नवा केला आहे. यांतील जिल्हे:–मुंबई सबर्बन, नासिक, ठाणें आणि कुलाबा.

**७ जिल्हे भाषावार** ( गुजराथी, मराठी व कानडी. )

**गुजराथी** जिल्हे ५. अहमदाबाद, खेडा, पंचमहाल, भडोच व सुरत.

**मराठी** जिल्हे १०. पूर्वखानदेश, पश्चिमखानदेश, नासिक, पुणें, अहमदनगर, सातारा, सोलापूर, ठाणें, कुलाबा आणि रत्नागिरी.

**कानडी** जिल्हे ४. बेळगांव, धारवाड, कारवार आणि विजापूर.

उत्तर भागांतील मराठी जिल्हा ठाणें. दक्षिणभागांतील मराठी जिल्हे कुलाबा आणि रत्नागिरी. कोंकणांतील मराठी जिल्हे ठाणें, कुलाबा आणि रत्नागिरी.

**८ संस्थानांचे विभाग** ५ आहेत. कच्छ ( राजधानी भूज ), काठेवाड एजन्सी ( राजकोट ), गुजराथ एजन्सी ( बडोदें ), महाराष्ट्रांतील जहागिरी आणि दक्षिण महाराष्ट्रांतील जहागिरी ( कोल्हापूर ).

**९ संस्थानें** मुंबई इलाख्यांत सुमारें पावणेचारशें आहेत.

**मोठीं संस्थानें** कच्छ, बडोदें, पालनपूर, जुनागड, भावनगर, नवानगर, कोल्हापूर, हीं व्हाइसरायांच्या देखरेखीखालीं आहेत.

**एजन्सीज:**–काठेवाड एजन्सी, सुरत एजन्सी, पालनपूर एजन्सी, महीकांठा एजन्सी, रेवाकांठाएजन्सी, आणि कोल्हापूर एजन्सी.

**जहागिरी:**–भोर, औंध, फलटण, अक्कलकोट, मुधोळ, रामदुर्ग, सावनूर, जत, जव्हार, जंजिरा, सावंतवाडी, सांगली, मिरज, बुधगांव, कुरुंदवाड, वडगांव, जमखंडी, डफळापूर, सुरगणा.

**१० संस्थानें** भागवार व जिल्हावार, **सिंधमध्यें** खैरपूर. **गुजराथेंत** सुरत, पालनपूर, महीकांठा, रेवाकांठा, खंबायत व बडोदें संस्थान. **काठे-**

**वाडांत** जुनागड, भावनगर, नवानगर, गोंडल, मोरवी, ध्रांगध्रा, राजकोट.

**मध्यभागांतील प. खा.** डांगदेश, मेवासोप्रांत. **नासिक**–सुरगणा. **पुणें**–भोर. **सातारा**–औंध, फलटण. **सोलापूर**–अक्कलकोट.

**दक्षिणभागांतील बेळगांव**–मुधोळ, रामदुर्ग. **धारवाड**–सावनूर. **विजापूर**–जत, डफळापूर. **ठाणें**–जव्हार. **कुलाबा**–जंजिरा. **रत्नागिरी**–सावंतवाडी.

**मराठी संस्थानें**—कोल्हापूर, सांगली, मिरज, जमखंडी, वगैरे.

११ **संस्थानें** जातवार ( राजाच्या जातीवरून ).

**ब्राह्मण**:–सांगली, मिरज, बुधगांव, कुरुंदवाड, वडगांव, जमखंडी, रामदुर्ग, औंध, भोर व इचलकरंजी.

**रजपूत**:-कच्छ, भावनगर, नवानगर, गोंडल, मोरवी, राजकोट इत्यादि.

**मराठे**:–बडोदें, कोल्हापूर, फलटण, अक्कलकोट, सावंतवाडी, मुधोळ, जत, कागल व विशाळगड.

**कोळी**:–सुरगणा, जव्हार व डांगदेश.

१२ **संस्थानिकांच्या पदव्या**:–छत्रपति महाराज-कोल्हापूर. महाराज-बडोदें, ईदर. राव–कच्छ. सरदेसाई—सावंतवाडी. राजेसाहेब–मुधोळ. पंतसचिव–भोर. पंतप्रतिनिधि–औंध. नबाब–खैरपूर, जुनागड, जंजिरा, सावनूर, खंबायत व सचीन.

१३ **पोलिटिकल एजंटच्या रेसिडेन्सीज**:–भूज, राजकोट, बडोदें, पालनपूर आणि कोल्हापूर.

१४ **कलेक्टराच्या देखरेखीखालचीं संस्थानें**:–सुरत एजन्सी, जव्हार, जंजिरा, सुरगणा, अक्कलकोट, औंध, भोर, फलटण, सावनूर.

१५ **पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांतील प्रदेश**:–गोवें, दमण व दीव. क्षेत्र ११ शें चौ. मैल. लोकसंख्या ६ लक्ष. पोर्तुगीज गव्हर्नर जनरल **मार्मगोंवा** येथें राहातो. **पणजी** एक बंदर आहे.

१६ **पर्वत**:–हाला ऊर्फ खिरथर [ सिंधमध्यें ], गिरनार [ काठेवाडांत ], अरवली व विंध्य ( गुजराथेंत ), सातपुडा ( नर्मदा व तापी

यांमध्यें ), सह्याद्रि ( देश व कोंकण यांमध्यें ), **पूर्वपश्चिमपर्वत**–विंध्य, गिरनार व सातपुडा. **दक्षिणोत्तरपर्वत**–अरवली, हाला व सह्याद्रि.

१७ **डोंगर**–राजपिंपळा ( नर्मदा व तापी यांमध्यें ), अजिंठा किंवा सातमाळा [पू. खा.], चांदवड व कळसूबाई ( नासिक ), हरिश्चंद्रगड [ नगर ], शंभूमहादेव [ सातारा ], जोतिबा ( कोल्हापूर ), वैजनाथ ( बेळगांव ).

१८ **शिखरें**–अबू [ अरवलींत ], कैमूर [ विंध्यमध्यें ], महादेव व पंचमढी [ सातपुड्यांत ], कळसूबाई व मलयगिरी [ सह्याद्रींत ].

१९ **खिंडी**—खैबर [ अटक रस्त्यावर ], बोलन [ सक्कर रस्त्यावर ].

२० **घाट**—थळघाट [ इगतपुरीजवळ ], बोरघाट ( खंडाळ्याजवळ ), कुंभारलीघाट, आंबेघाट, फोंडाघाट, आंबोलीघाट व तिनैघाट.

२१ **कोरींव लेणीं**–अजिंठा-पू. खा. मध्यें, कार्ले-पुणें जि.त, कानेरी--ठाणें जि.त, घारापुरी-कुलाबा जिल्ह्यांत.

२२ **उन्हाळीं**–ऊन पाण्याचे झरे--चोपडें ( पू. खा. ), वज्रेश्वरी ( ठाणें ), राजापूर ( रत्नागिरी जिल्ह्यांत ).

२३ **उत्तम हवेचीं ठिकाणें**--अबू--गुजराथेंत. सप्तशृंग, इगतपुरी, त्र्यंबक--नासिक जि. त. लोणावळें, खंडाळें, पुरंदर, सिंहगड--पुणें जि. त. हरिश्चंद्रगड-नगर जि. त. महाबळेश्वर, पांचगणी-सातारा जि. त. माथेरान, ठाणें जि. त. रायगड--कुलाबा जि. त. दापोली--रत्नागिरी जि. त. मिरज, बेळगांव.

२४ **नद्याः**–सिंधु, लुनी, साबरमती, मही, नर्मदा, तापी, गोदावरी, कृष्णा, भीमा, निरा, घटप्रभा, मलप्रभा व शरावती.

२५ **सिंधु** ( १८०० ) ही नदी हिमालयांतील कैलास पर्वतांत मानस सरोवराजवळ उगम पावून पश्चिम व दक्षिण या दिशांनीं पंजाब व सिंधप्रांत यांतून वहात जाऊन, अनेक मुखांनीं अरबीसमुद्रास मिळते. **कांठीं गांवें**-अटक, मिथनकोट, सक्कर व हैदराबाद. **उजवीकडून** काबूल नदी अटकेजवळ मिळते.

डा. सि. नद्या—जेहलम, चिनाब, रावी, बियास व सतलज मिळून झालेली पंचनदी मिथनकोटाजवळ मिळते. **सिंधूचें पात्र वारंवार बदलतें,**

यामुळें कांठीं फार गांवें नाहींत. **हिचा प्रवाह** संथ नाहीं त्यामुळें जलमार्ग उपयोगी नाहीं. **सिंधूचे कालवे** फार काढिले आहेत. सक्कराग प्रचंड धरण आहे.

**२६ सक्करचें लॉइड धरणः**—ह्या धरणाचें फारच प्रचंड स्वरूपाचें काम १९२३ सालीं सुरू झालें असून तें १९३५ सालीं पुरें होईल. कालव्याच्या शाखा व उपशाखा यांची लांबी ३ हजार मैल लांब होईल. खर्च २० कोटि रुपये येईल! ह्याच्या पाण्यानें ६० लक्ष एकर जमीन भिजून गहूं व कापूस दरसाल २० लक्ष टन मिळेल. ह्या धरणामुळें सिंध प्रांताला ‘ जगाच्या धान्याच्या कोठाराचा ’ मान मिळून देश धनधान्यसमृद्ध होईल!

**२७ लुनी** [ ३२० ] ही नदी राजपुतान्यांत अरवलीच्या फांट्यांत उगम पावून माळवा व राजपुताना यांतून दक्षिणेकडे वहात जाऊन कच्छच्या रणास मिळते.

**२८ साबरमती** (२००) ही नदी राजपुतान्यांत अरवलीच्या फांट्यांत उगम पावून गुजराथेंतून दक्षिणेकडे वहात जाऊन खंबायतच्या आखातास मिळते. **कांठीं गांव** अहमदाबाद.

**२९ मही** [ ३५० ] ही नदी माळव्यांत उगम पावून नैर्ऋत्येकडे वहात जाऊन खंबायतच्या आखातास मिळते. **कांठा गांव** खंबायत.

**३० नर्मदा** [ ७३५ ] ही नदी मध्यप्रांतांतील रेवा संस्थानांत अमरकंटकाजवळ उगम पावून विंध्य व सातपुडा यांच्यामधून पश्चिमेकडे वहात जाऊन खंबायतच्या आखातास मिळते. **कांठीं गांवें**—जबलपूर, भडोच. **हिचा** जबलपूरजवळील शुभ्र संगमरवरी खडकांतील प्रवाहाचा देखावा रमणीय आहे. हिचा प्रवाह जोराचा ह्मणून जलमार्ग उपयोगी नाहीं.

**३१ तापी** ( ४४० ) ही नदी सातपुड्यांत बेतुलाजवळ उगम पावून पश्चिमेकडे वहात जाऊन सुरतेजवळ खंबायतच्या आखातास मिळते. **कांठीं गांव** सुरत. **डा. मि. नद्या**—पूर्णा, गिरणा ऊर्फ मोसम, बोरी, पांझरा, **कांठीं गांवें** धुळें [ पांझरा ], अंमळनेर [ बोरी ].

**३२ नर्मदा व तापी यांची तुलना**—१ दोन्ही पश्चिम वाहिनी, २ जलमार्ग निरुपयोगी. ३ नर्मदा तापीच्या दुप्पट लांब आहे. ४ दोहोंमध्यें सातपुडा आहे. ५ दोहोंच्या कांठीं अरण्यें आहेत.

**३३ गोदावरी** [ ९०० ] ही नदी सह्याद्रींत त्र्यंबकेश्वराजवळ उगम पावून मुंबई इलाखा, निजामचें राज्य व मद्रास इलाखा यांतून वहात जाऊन आग्नेयोकडे राजमहेंद्री शहराजवळ बंगालच्या उपसागरास मिळते. **कांठीं गांवें** त्र्यंबक, नासिक, कोपरगांव, पुणतांबें, नेवासें, पैठण व राजमहेंद्री. **डा. मि. नद्या**—कादवा, पूर्णा, प्राणहिता [ पैनगंगा, वर्धा व वैनगंगा मिळून झालेली ] व इंद्रावती. **उ. मि. नद्याः**–दारणा, प्रवरा व मांझरा. प्रवरेच्या **कांठीं** संगमनेर आहे. गोदावरीच्या कालव्यांची लांबी ५००० मैल आहे.

**३४ कृष्णा** ( ८०० ) ही नदी सह्याद्रींत महाबळेश्वराजवळ उगम पावून मुंबई इलाखा, निजामचें राज्य व मद्रास इलाखा यांतून वहात जाऊन पूर्वेकडे मच्छलीपट्टणाजवळ बंगालच्या उपसागरास मिळते. **कांठीं गांवें** महाबळेश्वर, धोम, वांई, माहुली, कऱ्हाड, औदुंबर, सांगली, नरसोबाची वाडी, बेझवाडा व मच्छलीपट्टण. **डा. मि. नद्याः**–भीमा, डोण व वेरळा. **उ. मि. नद्या**–वेण्णा, कोयना, वारणा, पंचगंगा, घटप्रभा, मलप्रभा, वर्धा आणि तुंगभद्रा. **कांठीं गांवें**–कऱ्हाड-कृष्णा कोयना संगमावर. गोकाक, मुधोळ, बागलकोट–घटप्रभेकांठीं. तालीकोट डोणकांठीं. **कृष्णेस** बेझवाडा येथें कालवे काढिले आहेत. कृष्णेचा **प्रवाह** संथ नाहीं, म्हणून जलमार्ग उपयोगी नाहीं.

**३५ कृष्णा व गोदावरी यांची तुलना. साम्य** १ दोहोंचा उगम सह्याद्रींत. २ दोन्ही पूर्ववाहिनी. ३ दोन्ही पूर्वघाटाचा भेद करून जातात. ४ दोहोंचा प्रवाह निजामसरहद्दीवरून गेला आहे. ५ प्रवाह संथ नाहींत. ६ जलमार्ग उपयोगी नाहींत. **भेद** १ गोदावरी पूर्व-दक्षिण वाहिनी तर कृष्णा दक्षिण-पूर्व वाहिनी. २ गोदावरीचा प्रवाह जास्त लांब व संथ आहे.

**३६ भीमा** ही नदी पुणें जिल्ह्यांत भीमाशंकर येथें उगम पावून आग्नेयीकडे वहात जाऊन निजामच्या राज्यांत कृष्णेस मिळते. **कांठीं गांवें** भीमाशंकर, कोरेगांव, दौंड, निरानरसिंहपूर व पंढरपूर. **डा. मि. नद्या**—घोड व सिना. **उ. मि. नद्या** इंद्रायणी, मुळामुठा, निरा व माण. इंद्रायणी कांठीं देहू व आळंदी आहेत. मुळामुठाकांठीं पुणें आहे.

**३७ शरावती** ही नदी कारवार जिल्ह्यांतून पश्चिमेकडे वहात जाऊन

अरबी समुद्रास मिळते. हिचा गिरसप्पाजवळ ९॥ शें फूट उंचीचा मोठा धबधबा आहे.

३८ कोंकणांतील अरबीसमुद्रास मिळणाऱ्या पश्चिम वाहिनी नद्या--**ठाणें** जिल्ह्यांत तान्सा, वैतर्णा व उल्हास. **कुलाबा** जिल्ह्यांत अंबा, कुंडलिका व सावित्री. **रत्नागिरी** जिल्ह्यांत वासिष्ठी, सावित्री, शास्त्री व मुचकुंदी.

३९ **उगम हिमालयांत** सिंधु. **अरवलींत** लुनी, साबरमती. **विंध्यमध्यें** मही. **सातपुड्यांत** नर्मदा व तापी. **सह्याद्रींतून पूर्ववाहिनी** गोदावरी, कृष्णा, भीमा. **पश्चिमवाहिनी** शरावती व ३८ मधील तान्सा वगैरे.

४० **उत्तरवाहिनी नद्या**--खारी कच्छमधील.

**दक्षिणवाहिनी**--सिंधु, लुनी, साबरमती व मही.

**पश्चिमवाहिनी**--नर्मदा, तापी, शरावती व ३८ मधील तान्सा वगैरे.

**पूर्ववाहिनी**--गोदावरी, कृष्णा, भीमा, निरा व घटप्रभा.

४१ **मुंबई** इलाख्यांत उगम पावून इतर प्रांतांत वाहाणाऱ्या नद्या--गोदावरी, कृष्णा, भीमा व तुंगभद्रा. **इतर** प्रांतांत उगम पावून मुंबई इलाख्यांत वाहणाऱ्या नद्या--सिंधु, लुनी, साबरमती, मही, नर्मदा, तापी, शरावती. **मुंबई** इलाख्यांत उगम पावून त्यांतच वाहणाऱ्या नद्या--गिरणा, प्रवरा, निरा, मुळामुठा, वेण्णा, कोयना, वारणा, पंचगंगा, मलप्रभा, तान्सा, इ.

४२ **अरबी** समुद्रास मिळणाऱ्या नद्या--सिंधु, तान्सा [ ३८ ] वगैरे, शरावती. **कच्छच्या** आखातास मि. लुनी, खारी. **खंबायतच्या** आखातास मि. साबरमती, मही, नर्मदा, तापी. **बंगालच्या** उपसागरास मि. नद्या---कृष्णा व गोदावरी.

४३ **नद्यांचीं उगमस्थानें**--मानससरोवर, अमरकंटक, बैतूल, त्र्यंबकेश्वर, महाबळेश्वर, भीमाशंकर. **संगमस्थानें**--मिथनकोट, निरानरसिंहपूर, कऱ्हाड, नरसोबावाडी. **नद्यांचीं मुखें**--खंबायत, अहमदाबाद, भडोच, सुरत, राजमहेंद्री व मच्छलीपट्टण.

४४ **प्रांतवार नद्या--सिंधमध्यें** सिंधु. **गुजराथेंत** साबरमती, मही, नर्मदा व तापी. **महाराष्ट्रांतील** गोदावरी, कृष्णा, भीमा व निरा. **दक्षिण महाराष्ट्रांत**--घटप्रभा, मलप्रभा, तुंगभद्रा व शरावती.

४५ **जिल्हावार नद्या**. पू. खा.–तापी, पूर्णा, गिरणा व बोरी. **प. खा.** तापी, पांझरा व बोरी. **नासिक**–गोदावरी, गिरणा, दारणा व बोरी. **पुणें**–भीमा, निरा, मुळा, मुठा. **नगर**–गोदावरी, भीमा, प्रवरा, सिना. **सातारा**–कृष्णा, निरा, वेण्णा, कोयना, वेरळा, वारणा व माण. **सोलापूर**–भीमा, निरा, माण व सिना. **बेळगांव**–कृष्णा, घटप्रभा, मलप्रभा, ताम्रपर्णी, मार्कंडी, हिरण्यकेशी. **धारवाड**–मलप्रभा व तुंगभद्रा. **कारवार**–वर्धा, शरावती. **विजापूर**–कृष्णा, भीमा. **ठाणें**–तान्सा, वैतर्णी, उल्हास. **कुलाबा**–अंबा, कुंडलिका, सावित्री. **रत्नागिरी**–वाशिष्ठी, सावित्री, शास्त्री व मुचकुंदी.

४६ **धबधबे**–कारवार जिल्ह्यांत शरावती नदीच्या योगानें झालेला गिरसप्पा धबधबा ९५० फूट उंच आहे. घटप्रभेचा **गोकाक** जवळील धबधबा १७६ फूट उंच आहे. वेण्णा नदीचा महाबळेश्वराजवळ आहे.

४७ **धरणें**—सक्कर, लोणावळें, खडकवासलें, भाटघर, भंडारदरा, सोमवडी, गोकाक;

४८ **कालवे**—सिंधु, निरा, मुळामुठा, कृष्णा, गोदावरी यांचे काढिले आहेत.

४९ **जलमार्ग**—सिंधु, नर्मदा, तापी यांचा उपयोगी नाहीं. कारण मुखांत गाळ सांचलेला आहे. शिवाय प्रवाह जोराचे आहेत.

५० **समुद्र**—मुंबई इलाख्याच्या पश्चिमेस अरबी समुद्र आहे.

५१ **खाड्या**—वसई, नागोठाणें, रेवदंडा, बाणकोट, दाभोळ, विजयदुर्ग व देवगड.

५२ **आखातें**—कच्छचें व खंबायतचें. पैकीं कच्छच्या आखातांत मोतीं सांपडतात.

५३ **द्वीपकल्पें**—कच्छ व काठेवाड.

५४ **भूशिरें**—मॉंझ [कराचीजवळ], दीव (काठेवाडच्या दक्षिणेस).

५५ **बेटें**—मुंबई, साष्टी, द्वारका, दीव, उरण, घारापुरी.

५६ **बंदरें**—मुंबई, कराची, कारवार, वेंगुर्लें, गोवें, रत्नागिरी, मालवण, मांडवी, पोरबंदर, अलिबाग, वेरावळ, भटकळ.

ग्रंथ संग्रहालय

५७ **बंदरें भागवार**:—**सिंधमध्यें** कराची. **कच्छमध्यें** मांडवी. **काठेवाडांत** द्वारका, पोरबंदर, वेरावळ, घोघो. **गुजराथेंत** भडोच, सुरत. **ठाणें**–उंबरगांव, वसई, माहीम. **कुलाबा**–अलिबाग, जंजिरा, श्रीवर्धन, रेवदंडा, बाणकोट. **रत्नागिरी**–दाभोळ, जयगड, रत्नागिरी, राजापूर, विजयदुर्ग, देवगड, मालवण, वेंगुर्लें, चिपळूण, हर्णै. **गोव्यांत** मार्मगोंवा, पणजी. **कारवार**–कारवार, अंकोला, कुमठें, होनावर, भटकळ.

५८ **दीपगृहें**–अलिबाग, कराची, कुलाबा, मांडवी, राजापूर.

५९ **मिठागरें**—उरण, कुर्लें, पेण व वसई.

६० **सरोवरें व तलाव**—**मंचर** सिंधमध्यें आहे. **व्याहाड, तुळसी** व **तान्सा** हे ठाणे जिल्ह्यांतील तलाव, मुंबईच्या पाणी पुरवठ्यासाठीं बांधिले आहेत.

६१ **वालुकामय प्रदेश**–कच्छचें रण हें पाणथळ व क्षारमय आहे. हें पावसाळ्यांत समुद्राच्या पाण्यानें भरतें, पाणी आटल्यावर मासे अडकून राहून मरतात, त्यांची भयंकर घाण सुटते.

६२ **इतिहास प्रसिद्ध स्थळें**:–उमरकोट, पुणें, प्रतापगड, बडोदें, रायगड, विजापूर, शिवनेरी, सातारा, सिंहगड, सुरत, सोमनाथ.

६३ **इतिहास प्रसिद्ध पुरुषांचीं जन्मस्थानें**:–उमरकोट (अकबर), कणेरखेड ( राणोजी शिंदे ), नगर [चांदबिबी], पोलादपूर ( बाजी देशपांडे ), माहुली ( रामशास्त्री प्रभुणे ), वेळास (नाना फडणीस), शिवनेरी [शिवाजी], श्रीवर्धन [ बाळाजी विश्वनाथ ], होळ [ मल्हारराव होळकर ].

६४ **जुन्या राजधान्या**:—अलिबाग ( जंजिऱ्याचे सिद्दी ), कोल्हापूर ( ताराबाई ), नगर ( निजामशाही ), पुणें ( पेशवे ), बडोदें [ गायकवाड ], रायगड ( शिवाजी ), सातारा [ शिवाजीचे वंशज ], सुरत [ ईस्ट इंडिया कंपनी ], विजापूर ( आदिलशाही ), हैदराबाद [ सिंधचे अमीर ].

६५ **किल्ले**:— १ **डोंगरी** ( गड ) अजिमतारा, तोरणा, परळी, प्रतापगड, रायगड, शिवनेरी, सिंहगड. २ **भुईकोट** [ **कोट** ] अहमदनगर, खर्डें, पुणें, बदामी, बेळगांव, मालेगांव, विजापूर. ३ **जंजिरे** [ **दुर्ग** ] अलिबाग, मालवण, वसई, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग व सुवर्णदुर्ग.

६६ **रणभूम्याः**–तालीकोट ( मुसलमान व हिंदु १५६५ ), वसई [ मराठे व पोर्तुगीज १७३९ ), खर्डे ( मराठे व निजाम १७९५ ), कोरेगांव, खडकी व अष्टे [ इंग्रज व मराठे १८१८ ], मियाणी [ सिंध अमीर व नेपियर १८४३ ].

६७ **संत व कवि यांचीं स्थानें**:–आळंदी ( ज्ञानदेव ), देहू [ तुकाराम ], बारामती ( मोरोपंत ), कऱ्हाड ( संत सखूबाई ), कुमठें ( वामनपंडित ), जांब व परळी ऊर्फ सज्जनगड ( रामदास ); पुणतांबें ( चांगदेव ), श्रीगोंदें ( शेखमहंमद ), संगमनेर [ अनंतफंदी ), मंगळवेढें ( दामाजीपंत ), सोलापूर ( रामजोशी ).

६८ **क्षेत्रें**:—**राजपुतान्यांत** अबू. **गुजराथेंत** द्वारका, सोमनाथ, डाकूर. **नासिक जि.** नासिक, त्र्यंबक, सप्तशृंग. **पुणें जि.** भीमाशंकर, देहू, आळंदी, जेजुरी, निरानरसिंगपूर, चिंचवड. **नगर जि॰** पुणतांबें. **सातारा जि॰** महाबळेश्वर, धोम, वांई, कऱ्हाड, माहुली, औदुंबर. **सोलापूर जि॰** पंढरपूर. **ठाणे जि॰** निर्मळ, वज्राबाई. **कुलाबा जि॰** प्रतापगड. **रत्नागिरी जि॰** परशुराम. **बेळगांव जि॰** संकेश्वर, सौंदत्ती. **कोल्हापूर** नरसोबावाडी. **कारवार जि॰** गोकर्ण महाबळेश्वर.

६९ **लष्करी छावण्या**:—जाकोबाबाद, डीसा, मुंबई, मालेगांव, भगूर, पुणें ( खडकी, घोरपडी, वानवडी ), अहमदनगर, बेळगांव.

७० **सेंट्रल जेल**:—( मोठे तुरुंग ) मुंबई, उमरखाडी, साबरमती, येरवडा, ठाणें, हिंडलगें ( बेळगांव ).

७१ **प्रेक्षणीय स्थलें**:—**मनोरे**--कऱ्हाड. **जैनांचीं देवालयें**--अबू. **प्रसिद्ध इमारती**--अहमदनगर, अहमदाबाद, कोल्हापूर, बडोदें, पुणें, विजापूर.

---

## प्रादेशिक माहिती.

७२ **प्रदेशाचें स्वरूप**:—१ **सह्याद्रीच्या** पूर्वेकडील व काठेवाडचा मध्यभाग उंचवट्याचा असून बाकी सर्व प्रदेश सखल आहे. २ **उतार**:– नद्यांच्या प्रवाहाच्या दिशेकडील प्रदेश उतरता आहे. ३ **सिंधप्रांत** सखल व

नोंद नं. ता.

ओसाड असून उतार दक्षिणेकडे आहे. ४ काठेवाडांत किनाऱ्याचा प्रदेश सखल व मधला उंचवट्याचा आहे. ५ गुजराथ [illegible] व सुपीक असून दक्षिण–पश्चिमभाग उताराचा आहे. ६ देश उंचवट्याचा व सुपीक असून उतार पूर्वेकडे व आग्नेयीकडे आहे. ७ कोंकण सखल, दाट झाडीचा व दलदलीचा असून उतार पश्चिमेकडे आहे.

७३ **हवामान**—ह्मणजे एकाद्या प्रदेशाचें सरासरी उष्णतामान. हवामानाचे प्रकार चार आहेत. १ उष्ण किंवा थंड. २ सम किंवा विषम. ३ दमट किंवा कोरडी. ४ रोगी किंवा निरोगी.

७४ **हवामानाचीं कारणें**:–१ प्रदेशाची उंची जों जों जास्त तों तों हवा कमी उष्ण असते. उदा० डोंगराळ प्रदेश. २ प्रदेश जसजसा सखल तसतशी हवा उष्ण असते. उदा० देश. ३ समुद्रापासून दूर प्रदेशीं व वाळवंटांत उन्हाळ्यांत उष्णता व हिंवाळ्यांत थंडी फार असते. उदा० सिंध. ४ **सिंधमध्यें** हवा उष्ण, विषम व कोरडी आहे. ५ **देशावर** मध्यम उष्ण, विषम व कोरडी आहे. ६ **कोंकणांतील** हवा उष्ण, सम व दमट आहे.

७५ **हवामानाचे परिणाम**:--१ थंड हवेंतील लोक वर्णानें गोरे, कंटक व उद्योगी असतात. २ उष्ण हवेंतील लोक वर्णानें काळे, कमी बुद्धिमान् व कमी उद्योगी असतात.

७६ **मान्सून वारे** ह्मणजे निरनिराळ्या ऋतूंत नियमितपणें वाहणारे वारे. या वाऱ्यावरोबर समुद्रावरील पाण्याची वाफ ढगरूपानें जमिनीवर वहात येऊन पाऊस पडूं लागतो. मध्यें सह्याद्रि असल्यामुळें त्या भागांत पाऊस फार पडतो. पण उत्तरेस व पूर्वेस पावसाचें मान कमी होत जातें.

७७ **नैर्ऋत्येकडून वाहणारे मान्सून वारे**:--हे एप्रील ते सपटंबरपर्यंत हिंदी महासागरावरून वाहतात. यांनीं कोंकण व सह्याद्रि यांत पाऊस फार पडतो. दक्षिणेकडे पावसाचें मान वाढत जातें. या पावसावर खरोपांचीं पिकें होतात.

७८ **ईशान्येकडून वाहणारे मान्सून वारे**:–हे अक्टोबर ते मार्चपर्यंत वाहतात. [ १ ] जमिनीवरून येणाऱ्या वाऱ्यांत वाफ असत नाहीं. ह्मणून यावेळीं पाऊस पडत नाहीं व हवा कोरडी असते. ( २ ) बंगालच्या

उपसागरावरून येणाऱ्या वाऱ्यांत वाफ असते, यावेळीं पूर्वेकडे पाऊस बराच पडतो. ( ३ ) या हंगामांत रब्बीचीं पिकें होतात.

७९ **पाऊस**:–१ सह्याद्रीचा माथा व कोंकण यांत फार ( १०० ते २०० इंच ) पडतो. २ देशावर बेताचा ( २२ ते ४५ इंच ) पडतो. ३ गुजराथेंत डोंगर नसल्यानें पाऊस कमी [१५ ते ४५ इंच] पडतो. ४ सिंधमध्यें जमिनीच्या व हवेच्या उष्णतेमुळें ढगांची फिरून वाफ होते, त्यामुळें पाऊस अगदीं थोडा [ १० ते १५ इंच ] पडतो. ५ उत्तर गुजराथ, नगर, सोलापूर यांत क्वचित् दुष्काळ पडतो. ६ कर्नाटकांत पाऊस पुरेसा [ २५ ते ५५ इंच ] पडतो.

८० **सुपीकपणाचे नियम**:–१ नदीच्या मुखाकडील उत्तर प्रवाहाचा भाग फार सुपीक असतो, कारण नदीकांठीं गाळ सांचून ‘ गाळाच्या सुपीक जमिनी ’ तयार होतात. २ नदीचा मध्यप्रवाह आणि सखल व सपाट प्रदेश सुपीक असतात. ३ नदीच्या उगमाकडील पूर्व प्रवाह आणि लहान नद्यांच्या कांठचे प्रदेश कमी सुपीक असतात. ४ खडकाळ, डोंगराळ तसाच डोंगर उतरणीचा प्रदेश सुपीक नसतो. ( **प्रवाह** व्याख्या १३२ पहा. )

८१ **भागवार सुपीकपणा**:–( जमिनीचा कस ). १ सिंधमध्यें सिंधु कांठ सुपीक आहे. इतर भागांतील जमिनींत बारीक रेती मिसळलेली आहे. शिवाय पाऊस पडत नाहीं; यामुळें सुपीकपणा नाहीं. **सक्कर धरण झाल्यावर** ६० लक्ष एकर जमीन फारच सुपीक होईल! २ कच्छ व काठेवाड यांत लहान नद्या असल्यानें सुपीकपणा मध्यम आहे. ३ गुजराथ व महाराष्ट्र सुपीक आहेत. कारण जमीन कसदार असून नद्या विपुल आहेत. ४ देशाच्या पूर्वेकडे सखल व सपाट प्रदेश असून माती जास्त सांचते; ह्मणून कसदारपणा जास्त आहे. ५ नर्मदा, तापी, कृष्णा यांच्या कांठचा प्रदेश **फार** सुपीक आहे. ६ कोंकणांत जमीन रेताड व डोंगर–उतरणीची आहे, ह्मणून कोंकण सुपीक नाहीं. ७ सुपिकपणाचे नंबरः—गुजराथ, खानदेश, कर्नाटक, महाराष्ट्र व सिंध.

८२ **जमिनीचें उत्पन्न व पिकें**:– १ **देश**–ज्वारी, बाजरी, गहूं, मका, हरबरा, तूर, वटाणे, गळिताचीं धान्यें [ भुइमूग, करडी, तीळ, जवस], ऊंस, मिरची, हळद, तंबाकू, कापूस, अंबाडी, नीळ, लाख. **२ कोंकण**–

तांदूळ, नाचणी, वरी, वाल, कुळीथ, बटाटे, नारळ, सुपारी. ३ **दक्षिण कोंकण व कारवार**–अमसोलें, काजू, कॉफी, चंदन, ताग, नारळ, बटाटे, मिरीं, वेलदोडे, सुपारी, हरडे.

८३ **पिकांस अनुकूल कारणें**:–**ऊंस, हळद**–उष्ण हवा, कसदार काळी जमीन, भरपूर पाणी. **कापूस**–उष्ण हवा, काळी जमीन, बेताचा पाऊस. **गहूं**–कडक हिंवाळा, काळी जमीन, बेताचा पाऊस. **ज्वारी, बाजरी, हरबरा, तूर**—उष्ण हवा, काळी जमीन, कमी पाऊस. **तांदूळ**–उष्ण व दमट हवा, तांबडी जमीन, पाऊस भरपूर. **नारळ, सुपारी**–उष्ण व दमट हवा, समुद्र कांठची रेताड जमीन, पाणी भरपूर.

८४ **पिकांचे जिल्हे**–**अंबाडी**–देशावर. **ऊंस, मिरची, हळद व मका**-सातारा, पुणें, बेळगांव. **कापूस**–सिंध, गुजराथ, खानदेश, सोलापूर, धारवाड. **केळीं**-ठाणें. **गहूं**–याचें पीक नासिकच्या उत्तरेस वाढत जातें. सिंध, गुजराथ, खानदेश. **ज्वारी**, तूर, हरबरा व भुइमूग-कृष्णाकांठ, खानदेश, सातारा, सोलापूर, पुणें. **तंबाकू**-खेडा, बेळगांव. **ताग**-कोंकणांत. **तांदूळ**–कोंकण व पुणें. **द्राक्षें**-नासिक. **नारळ**, सुपारी-कोंकण. **बटाटे**-पुणें, रत्नागिरी. **बाजरी**-गोदावरी कांठ, खानदेश, नासिक, पुणें, नगर. **वेलदोडे**–कारवार जिल्हा.

८५ **भाज्या**:–अंबाडी, अळू, अगस्ता, कणगर, कांकडी, कांदे, कारलीं, केळ, कोथिंबीर, कोबी, गाजर, गोवारी, घेवडा, घोंसाळें, चंदनबटवा, चाकवत, चुका, तेरें [ रानआळूं ], तोंडलीं, दोडके, नोलकोल, पडवळ, बटाटे, भेंडी, भोंपळा, माठ, मिरची, मुळे, मेथी, रताळें, राजहिरा, लसूण, वांगीं, शेपू, शेवगा, सुरण.

८६ **फळें**:—१ **देशावर**-अंजीर, आंबे, कवठ, कलिंगड, डाळिंब, द्राक्षें, नारिंग, पपनस, पेरू, बोर, रामफळ, लिंबे, संत्रें, सीताफळ. २ **कोंकणांत**--अननस, अमसोलें, आलें, आंवळे, आंबे, काजू, केळ, जांभूळ, नारळ, फणस, मोसंबें, सुपारी.

८७ **झाडें**:— १ **देशांत**-आंबा, कळक, खैर, चिंच, पिंपळ, बाभूळ, लिंब, वड. २ **कोंकणांत**--आंवळे, आंबा, नारळ, फणस, बांबू (कळक), सागवान. सह्याद्रीच्या पश्चिमभागीं सागवानाचें उत्पन्न फार आहे.

८८ **प्राणी**:— १ **हिंस्र**-वाघ, कोल्हा, खोंकड, तरस, लांडगा, रानडुक्कर हे सह्याद्रीच्या जंगलांत आहेत. २ **पाळींव**- हत्ती, गाय, हैस, बैल, मेंढ्या, शेळ्या, कुत्रीं, मांजरें. ३ **सिंध** मधील उंट व गुजराथ--महाराष्ट्रांतील बैल प्रसिद्ध आहेत. ४ **काठेवाडांतील**--घोडे मोठे व मजबूत आहेत. ५ भीमा--गोदावरी कांठचीं तट्टें कंटकपणाविषयीं प्रसिद्ध आहेत. ६ काठेवाडांतील जाफराबादी म्हशी नामांकित आहेत. ७ काठेवाडांतील हत्ती व कच्छमधील रानगाढवें प्रसिद्ध आहेत. ८ **पक्षी**—कबूतर, करकोचा, कावळा, कोकीळ, कोंबडा, गिधाड, घार, चिमणी, टोळ, पारवा, बगळा, बहिरीससाणा, मैना, मोर, राघू. ९ **इतर प्राणी**—माकड, हरणें, ससे, सुसरी, मासे, सर्प, बेडूक, डांस, ढेंकूण, पिसू.

८९ **खनिज संपत्ति**:--**हिरे** (कृष्णा-गोदावरी कांठीं), **मोतीं** [ कच्छच्या आखातांत ], **सोनें** [ धारवाड ], **रुपें** ( कच्छ ). **तांबें** ( अरवली ), **शिसें** [ गुजराथ ], **लोखंड** व **मॅंगनीज** [ सह्याद्रि, बेळगांव, धारवाड, कारवार, व पंचमहाल ], **दगडीकोळसे** [ सिंध व कच्छ ], **पोरबंदरी** व **शहाबादी** दगड [ पोरबंदर ], **तुरटी** ( राजस्थान व कच्छ ), **मीठ** [ खाराघोडा ].

९० **दळणवळणाचीं साधनें**:--१ पक्क्या सडका, आगगाड्या, बैलगाड्या, टांगे, मोटार, वायसिकल, ट्राम [ विजेच्या गाड्या ], कालवे, आगबोटी, होड्या, मचवे, विमानें, पोष्ट व तारखातें, टेलिफोन, बिनतारीसंदेश. २ **पक्क्यासडका** आग्रारोड--मुंबईहून नासिक, धुळें, इंदूर, ग्वाल्हेर ते आग्रा. मुंबई ते मद्रास व हारेहर.

९१ **रेल्वे** [ लोहमार्ग ]. १ दि ग्रेट इंडियन पेनिन्शुला ऊर्फ जी. आय. पी. रेल्वे--मुंबई ते दिल्ली, दौंड ते मनमाड, धुळें ते चाळीसगांव. २ दि बॉंबे बडोदा अँड सेंट्रल इंडिया ऊर्फ बी. बी. अँड सी. आय. रेल्वे--मुंबई ते बडोदा. ३ मद्रास आणि सदर्न मराठा ऊर्फ एम्. एस. एम्. रेल्वे--पुणें ते बेंगळूर, मिरज--सांगली, मिरज-कोल्हापूर, हुबळी ते हुटगी, लोंढा ते मार्मगोवा. ४ राजपुताना माळवा रेल्वे—अहमदाबाद ते मारवाड. ५ सिंध पंजाब ऊर्फ नॉर्थ वेस्टर्न रेल्वे-- कराची ते जाकोबाबाद. ६ काठेवाड ऊर्फ भावनगर, गोंडल, जुनागड, पोरबंदर रेल्वे-- वढवाण ते भावनगर व राज-

कोट,वेरावळ ते मोरवी. ७ तापी व्हॅली रेल्वे-- सुरत ते अंमळनेर. ८ गोदावरी व्हॅली रेल्वे—मनमाड ते हैद्राबाद डेक्कन. ९ बार्शी लाइट रेल्वे--बार्शी ते पंढरपूर.

९२ **जंक्शन स्टेशनें**:—हैदराबाद, राजकोट, वढवाण, बडोदें, अहमदाबाद, मुंबई, जळगांव, भुसावळ, मनमाड, कल्याण, पुणें, मिरज, लोंढा, हुबळी, हुटगी. **रेल्वे कारखाने—**भुसावळ, परळ, मिरज, हुबळी.

९३ **उद्योगधंदे व कारखाने**—१ **आगपेट्या**—अहमदाबाद, अंबरनाथ, कऱ्हाड, बेळगांव. २ **औषधें**—चेंबूर, पनवेल, हर्णै, सांगली. ३ **कसाईखाना**—बांद्रें. ४ **कागद**—भावनगर, अहमदाबाद, मुंबई, मुंढवें, हडपसर, जुन्नर. ५ **कांच**—बडोदें, तळेगांव, ओगलेवाडी. ६ **कांचेच्या बांगड्या व मणी**—अहमदाबाद, घोडगेरी-बेळगांव. ७ **कातडीं कमावणें**-बेळगांव. ८ **कोरींव काम**—लांकूड व हस्तिदंत यांवरील-- अहमदाबाद, पुणें. ९ **कौलें**--मंगळूर व खानापूर. १० **खादी**--पासोड्या हातमाग-- खानदेश, सोलापूर, धारवाड, फैजपूर, चिकोडी. ११ **गालिचे व सत्रंज्या**--हैदराबाद, उमरकोट, तालीकोट, १२ **गिरण्या**—सरकी काढणें, सूत काढणें व कापड विणणें--अहमदाबाद, भडोच, मुंबई, अंमळनेर, जळगांव, धुळें, पुणें, अहमदनगर, सोलापूर, बार्शी, ठाणें, गोकाक. १३ **छत्र्या**—पुणें, मुंबई. १४ **जर व किनखापी कापड**—हैदराबाद, भूज, अहमदाबाद, सुरत, येवलें, पुणें. १५ **तूप व लोणी**—भावनगर, खानदेश, सांगली, धारवाड. १६ **तेल गाळणें**—मुंबई, पुणें, बेळगांव. १७ **तंबाकू व विड्या**--पुणें, निपाणी, सांगली. १८ **दागिने**—सोन्यारुप्याचें व जडावाचें काम--मुंबई, नासिक, पुणें, सांगली, कोल्हापूर. १९ **धातूंचीं भांडीं**—अहमदाबाद, नासिक, पुणें, सांगली, कोल्हापूर, हुबळी. २० **धातूंवरील नकशीकाम**--भूज, पुणें, कोल्हापूर. २१ **धान्याचा व्यापार**—पुणें, बार्शी, कर्जत, पेण, महाड. २२ **फार्निचर** व लांकडी रंगीत सामान--गोकाक, रत्नागिरी, सावंतवाडी. २३ **मीठ**--खाराघोडा, वसई. २४ **रेशीम व लोंकरीचें कापड**—भूज, अहमदाबाद, सुरत, मुंबई, ठाणें, भिवंडी, पैठण, येवलें, बारामती, पुणें. २५ **लांकूड**—तळोदें, तावरकट्टी. २६ **लुगडीं व खण**—अहमदाबाद, भिवंडी, जुन्नर, पुणें, संगमनेर, सोलापूर, सांगली, शाहापूर, धारवाड, इलकल. २७ **लोखंडी नांगर**—

व आऊतें-- पुणें, सातारारोड, किर्लोस्करवाडी. २८ **व्यापारी पेठा**--मुंबई, पुणें, मालवण, वेंगुर्लें, चिपळूण, निपाणी. २९ **शिंगावरील नकशीकाम**--विजयदुर्ग. ३० **साखर**--पुणें, बारामती. ३१ **साबण**--मुंबई. ३२ **सुकेळीं**--आगाशी, वसई. ३३ **संगमरवरी दगड**--दांटा, राजपिंपळा, नांदोद.

९४ **आयात मालः**--मुंबई व कराची या मुख्य बंदरांतून माल जातो व येतो. इलाख्याचा चार पंचमांश व्यापार मुंबई बंदरांतून होतो. आयातमाल १०० कोटींचा असून हा बहुतेक पक्का असतो. उदा० आगपेट्या, औषधें, कागद, कांच, कापड, कापूर, केशर, खेळणीं, घड्याळें, चहा, चाकू, काऱ्या, चिनीमातीचीं भांडीं, छत्र्या, दगडी कोळसा, दारू, धातूंचें सामान, फटाकड्या, मसाले, यंत्रें, रंग, राकेल, रुपें, रेशीम, लोंकर, लोखंड, साखर, साबूदाणा, सिगारेट, सूत, सोनें, स्टेशनरी, हस्तिदंत, हिंग.

९५ **निर्यात मालः**—[ १५० कोटि ]. हा बहुतेक कच्चा असतो. मुख्य माल--कापूस, गहूं, कापड, सूत. १ मुंबईहून निर्यात--माळव्यांतील अफू. गुजराथ, खानदेश, वऱ्हाड यांतील कापूस व गहूं. देशांतील धान्यें. कोंकणांतील नारळ व सुपारी. २ कराचीहून निर्यात--पंजाबांतील गहूं व लोंकर सिंधचा कापूस. ३ निर्यात माल--अफू, कातडीं, कापड, कापूस, कॉफी, गळिताचीं धान्यें ( आळशी, एरंड, करडी, जवस, तीळ, भुइमूग ), गहूं, जनावरें, [ गाई, म्हशी, बकरी, घोडे ], तंबाकू, तांदूळ, धान्यें, नीळ, फळें, मसाले, मांस, मोतीं, राळ, लांकूड, लाख, लोंकर, सुपारी, सूत, हरडें, हाडें.

९६ **लोक**--१ **धर्म**--हिंदु ( २ कोटि ), मुसलमानी ( ५० लक्ष ), खिस्ती ( २॥ लक्ष ), पारशी ( १ लक्ष ), जैन ( ५ लक्ष ), लिंगायत, यहुदी. २ मुसलमान सिंधमध्यें फार आहेत. खिस्ती लोक ठाणें, नगर, गोवें या भागांत फार आहेत. पारशी सुरत, मुंबई भागांत आहेत. जैनांची वस्ती गुजराथ व महाराष्ट्र यांत थोडी थोडी आहे. कोळी लोक कोंकणांत असून भिल्लांची वस्ती खानदेशांत आहे. ३ **लोकस्थिति**--पारशी लोक विद्येंत व व्यापारांत पुढें आहेत. भिल्ल, कोळी, अस्पृश्य हे मागसलेले आहेत. ब्राह्मण विद्येंत पुढें आहेत. जैन, लिंगायत, कच्छी हे व्यापारांत पुढें आहेत. मुसलमान लोक कडवे व शूर असून व्यापार करितात. मराठे शेतकींत पुढें आहेत. ४ व्यापारांत मारवाडी, कच्छी, पार्शी, लिंगायत, मुसलमान हुशार आहेत. शौर्य

व कडवेपणा यांत मुसलमान, रजपूत व मराठे प्रसिद्ध आहेत. विद्येंत महाराष्ट्रीय पुढें आहेत. ५ **लोकवस्ति**--गुजराथ, पुणें, सोलापूर यांत दाट आहे. महाराष्ट्र व कर्नाटक यांत वस्ति मध्यम आहे. सिंध, कोंकण यांत वस्ति फार पातळ आहे.

९७ **भाषा:**—**सिंधी** व **बलुची** सिंधमध्यें, **कच्छी** कच्छमध्यें, **गुजराथी** काठेवाड व गुजराथेंत, **मराठी** महाराष्ट्रांत, **कानडी** कर्नाटकांत, उर्दू मुसलमानांमध्यें, **इंग्रजी** सुशिक्षितांमध्यें बोलतात.

९८ **शिक्षण:**—१ शिक्षणाचे प्राथमिक अथवा प्रायमरी, दुय्यम व उच्च असे तीन वर्ग आहेत. १९२३ मध्यें प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत करण्याबद्दल कायदा पास झाला आहे. जिल्ह्यास हायस्कुलें आहेत. याशिवाय शेतकी शिक्षण व धंदेशिक्षण यांच्या शाळा अनेक आहेत. २ **कॉलेजें**–राजकोट, बडोदें, अहमदाबाद, मुंबई, पुणें, सांगली, कोल्हापूर, धारवाड येथें आहेत. ३ **शिल्पशाळा** बडोदें, पुणें, रत्नागिरी. ४ **शेतकी शाळा**—गुजराथेंत गोद्रा, सुरत. प. खा. धुळें. पुणें जि. लोणी काळभोर. ठाणें जि. जांभूळ. धारवाड जि. देवीहोसूर.

९९ **लोकांचे धंदे:**—शेतकी करणें, गुरें बाळगणें, कापड विणणें, मासे धरणें, मीठ करणें, कारखाने चालविणें, व्यापार, नौकरी वगैरे.

१०० **राज्यव्यवस्था:**—आपला हिंदुस्थान देश इंग्लंडच्या ताब्यांत असून सार्वभौम **पांचवे जॉर्ज** हे हिंदुस्थानचे बादशाहा आहेत. आपल्या मुंबई इलाख्यावर गव्हर्नर इन्कौन्सिल नांवाचे अधिकारी बादशाहा नेमितात. त्यांच्या मदतीस एक्झिक्युटिव्ह ह्मणजे कार्यकारी कौन्सिल [ सभासद ७ ] व लेजिस्लेटिव्ह ह्मणजे कायदेकौन्सिल [ सभासद १११ पैकीं ८६ लोकनियुक्त ] अशा दोन सभा आहेत. राज्यव्यवस्थेकरितां खातीं पाडलीं असून त्यांचे राखीव खातीं व सोपींव खातीं असे दोन प्रकार आहेत. राखींव खात्यांवर ४ मंत्री असून सोपींव खात्यावर ३ दिवाण आहेत. शिवाय प्रत्येक खात्यावर एकेक अंमलदार असून ते कायदे कौन्सिलच्या हुकुमाप्रमाणें व्यवस्था ठेवितात. जनरल खात्यावर चीफ सेक्रेटरी, न्याय खात्यास हायकोर्ट जज्ज, शाळाखात्यावर डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन, पोलिस खात्यावर इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस, वैद्यक खात्यावर सर्जन जनरल इत्यादि कामगार आहेत.

१०१ **मुंबई इलाख्याचे** कमिशनरी भाग, जिल्हे, तालुके व सर्कल असे विभाग केले आहेत. शें दोनशें गांवें मिळून तालुका होतो. ८-१० तालुके मिळून जिल्हा होतो. ५-६ जिल्हे मिळून कमिशनरी भाग होतो. गांवावर गांवकामगार पाटील कुलकर्णी, तालुक्यावर मामलेदार, जिल्ह्यावर कलेक्टर व भागावर कमिशनर हे मुख्य अंमलदार आहेत. इलाख्याचे गव्हर्नर साहेब व त्यांचें कार्यकारी मंडळ मिळून मुंबई सरकार होतें.

१०२ **उत्पन्नाचीं खातीं**:—जमीन महसूल, जकात, जंगल, प्रातीवरील कर, पोष्ट, स्टँप, नोंदणी, मीठ, मादक पदार्थ. **खर्चाचीं खातीं**:—लष्कर, पोलीस, शिक्षण, तुरुंग, पब्लिकवर्क्स, पाटबंधारे, दुष्काळनिवारण, वैद्यक. **राखीव खातीं**:—रेव्हेन्यू ( जमाबंदी ), फायनान्स, ( जमाखर्च ), अंतर्व्यवस्था, न्याय, पोलीस, तुरुंग, पाटबंधारे, दुष्काळनिवारण, स्टांप, नोंदणी, कर्ज. **सोपींव खातीं**:– अबकारी, आरोग्य, औद्योगिक, जंगल, पतपेढ्या, पब्लिकवर्क्स, रजिस्टर्ड संस्था, लोकलबोर्डें, म्युनिसिपालिट्या, वैद्यक, शिक्षण, शेतकी. **वरिष्ठ सरकारचीं खातीं**:–संस्थानें, रेल्वे, इन्कमटॅक्स, लष्कर इत्यादि.

१०३ **जिल्ह्यावरील कामगार**:—जमीन महसूल व फौजदारी खटले यासाठीं कलेक्टर किंवा डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट, असिस्टंट व डेप्युटी कलेक्टर आहेत. सेशन जज्ज व असिष्टंट जज्ज हे दिवाणी व फौजदारी खटले तपासतात. दवाखान्यांवर सिव्हिल सर्जन, पब्लिक वर्क्स ( रस्ते, कालवे ) यांवर एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, गुन्हेगार पकडून शांतता राखणाऱ्या पोलीस खात्यावर पोलीस सुपरिंटेंडंट, फॉरेस्ट-जंगल खात्यावर फॉरेस्ट ऑफीसर आणि शाळा खात्यावर डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर इत्यादि अधिकारी आहेत.

१०४ **तालुक्यांतील कामगार**:— मामलेदार–जमीन महसूल, खजीना, गुन्हे तपासणें यांवर असून यांच्या कचेरींत हेड् कारकून किंवा शिरस्तेदार असतो. गुन्हेगार पकडण्यास फौजदार, दस्त ऐवज नोंदण्यास सब रजिस्ट्रार, पोष्ट खात्यावर सब पोस्टमास्तर, शाळांवर तालुका मास्तर, जंगलें, कुरणें यांवर फॉरेस्टरेंजर व राउंडगार्ड, देवीखात्यावर व्हॅक्सिनेटर, न्यायखात्यावर सब जज्ज, असे कामगार असतात.

१०५ **गांव**:—गांवचा वसूल गोळा करून मामलेदाराकडे पाठविणें,

गांवची स्वच्छता ठेवणें, गुन्ह्याची चौकशी करणें, जनन मरणाची नोंद ठेवणें यांवर **पोलीस पाटील** मुख्य असतो. हिशेब लिहिण्यास **कुलकर्णी** किंवा **तलाठी** असतात.

१०६ **स्थानिक स्वराज्य. १ म्युनिसिपालिट्या:**— शहरची स्वच्छता ठेवणें, आरोग्य, शिक्षण, पाणी–पुरवठा, रस्ते वगैरे कामाकरितां घरपट्टी, जकात, फी वगैरे रूपानें कर घेतात. त्याची व्यवस्था शहरची लोकनियुक्त मंडळी पहाते. **२ म्यु० शहरें:**—मुंबई, अहमदाबाद, पुणें, कराची, सुरत, सोलापूर, हुबळी, धुळें, सातारा, वडोदें, कोल्हापूर, इ० मुंबई इ० त १५६ म्यु० असून उत्पन्न २॥ कोटी आहे. **३ लोकलबोर्ड:**—जिल्ह्यांतील लोकलफंडाच्या उत्पन्नांतून जिल्ह्यांत रस्ते करणें, विहिरी व तलाव खोदणें, शिक्षण देणें, आरोग्य राखणें इ० कामें जिल्ह्यांतील लोकानियुक्त मंडळी पहाते. तालुक्यास तालुका लो. बोर्ड व जिल्ह्यास डिस्ट्रिक्ट लो. बोर्ड अशा संस्था असतात. एकंदर जि. लो. बोर्ड २७ असून ता. लो. बोर्ड २२२ आहेत.

१०७ **संस्थानच्या राज्यव्यवस्थेवर देखरेख:**—मोठ्या संस्थानावर ( उ० बडोदें, कच्छ, पालनपूर, काठेवाड एजन्सीज ) गव्हर्नर जनरल देखरेख ठेवितात. तेथें **रेसिडेंट** नांवाचा अधिकारी असतो. लहान संस्थानांवर **पोलिटिकल एजंट** असतो. अगदीं लहान संस्थानांचा समूह करून त्यास **एजन्सी** नांव देतात. एजन्सीवर पोलिटिकल एजंट आहेत. ते गव्हर्नरच्या ताब्यांत असतात. जिल्ह्यांतील अगदीं लहान संस्थानांवर कलेक्टरची देखरेख असते. ( ८ ते १४ पहा. )

१०८ **मुंबई शहर** हें या इलाख्याची राजधानी आहे. जगांतील उत्तम बंदरांत व संपन्न शहरांत मुंबईची गणना होते. वस्ती १२ लाख आहे. जगांतील सर्व राष्ट्रांतील जहाजें मुंबई बंदरांत गजबजलेलीं दिसून येतात. या शहराची लांबी १२ मैल व रुंदी ३ मैल आहे. आगगाडीचे दोन फांटे या शहरांतून गेले असून आगगाड्या सारख्या धांवत असतात. याशिवाय विजेनें चालणाऱ्या ट्रामगाड्या व मोटारी यांची सतत रहदारी असते. रस्ते रुंद असून ते नेहमीं माणसांनीं गजबजलेले असतात. शहरांतील भव्य इमारती कारखाने, गिरण्या, गोद्या व दाट वस्ती पाहून मन आश्चर्यानें थक्क होतें. ठाणे जिल्ह्यांत मुद्दाम तलाव बांधून तेथून नळ टाकून मुंबई शहरांत पाण्याचा

पुरवठा केला आहे. येथें गिरण्या व कारखाने शेंकडों असून त्यांतून लाखों मजूर काम करितात. तसेंच श्रीमंत व्यापाऱ्यांच्या पेढ्याहि पुष्कळ आहेत. कोट ह्मणून जो भाग आहे तेथें सरकारी ऑफिसें व युरोपियन कंपन्यांचीं दुकानें आहेत. मलबार टेंकडीवर वाळकेश्वर येथें गव्हर्नर साहेबांचा बंगला आहे. मुंबई म्युनिसिपालिटी अतिशय संपन्न असून तीस ' कार्पोरेशन ' असें ह्मणतात. मुंबईतील प्रेक्षणीय स्थलें:–अपॉलो बंदर, क्राफर्ड मार्केट, ग्रँट मेडिकल कॉलेज, टांकसाळ, ताजमहाल हॉटेल, दिवादांडी, पोष्ट ऑफिस, बॅकबे [ चौपाटी ], बोरीबंदर स्टेशन, मलबार हिल, महालक्ष्मी, राजाबाई टॉवर [ मनोरा ], वाळकेश्वर, सेक्रेटरीएट, हायकोर्ट, व्हिक्टोरिया गार्डन.

१०९ **मुंबईस महत्त्व कां आलें?** इ. स. १६६२ सालीं हें बेट इंग्लिशांच्या हातीं आलें; त्यावेळीं तें ४।५ शें घरांचें एक ओसाड व भिकार खेडें होतें. पण इंग्रजी अमदानींत त्याची भरभराट होऊन त्यास हल्लींचें वैभव प्राप्त झालें. **उत्कृष्ट बंदर**, जगाशीं चालणाऱ्या व्यापाराचें केंद्रस्थान, श्रीमंत धाडशी व्यापाऱ्यांचे उद्योग, हिंदुस्थानचे प्रवेशद्वार, युरोपखंडाचें सान्निध्य, रेल्वेची सोय या कारणांनीं या शहराची वाढ झपाट्यानें झाली आहे.

---

# इलाख्याची विशेष माहिती.

११० **सिंधप्रांत** इतर भागांहून अलग आहे. कारण मध्यें मैदान, वाळवंट व समुद्र आहे; त्यामुळें दळणवळण कमी. पोषाख, भाषा, चालरीत, हवा इत्यादि इतर भागांहून भिन्न आहे. **भाषा** सिंधी व बलुची. **वस्ती** $\frac{3}{4}$ मुसलमानांची आहे. **नदी** सिंधु, हिला दोन मोठे पूर येतात. हिचा कांठ सुपीक आहे. **पाऊस** कमी पडतो. **पिकें** कापूस व बटाटे. **शहरें**:—१ **कराची** [ २१६ ] मुख्य शहर व नं. २ चें बंदर. ३ कोटींचा व्यापार चालतो. २ **उमरकोट**–अकबराचें जन्मस्थान, थर पारकर जिल्ह्याचें ठाणें. ३ **जाकोबाबाद** [ ११ ] अप्पर सिंध फ्रॉंटियर जि० चें ठाणें. येथें फौजेची छावणी आहे. येथील उन्हाळा फार कडक असतो. ४ **मियानी**–रणभूमि. ५ **सक्कर** ( ४३ ) सिंधूच्या पूर्वतीरावर बोलन् रस्त्यावर असून मोठा व्यापार चालतो. येथें मोठें धरण आहे. ६ **हैद्राबाद** (८२) सिंधूच्या पूर्वतीरावर असून

ग्रं. क्र. ३२३३

येथें पूर्वी अमीराची राजधानी होती. हें रेल्वे जंक्शन असून व्यापार व गालिचे याविषयीं प्रसिद्ध आहे. **संस्थान खैरपूर** ( उत्पन्न ३१ लक्ष ) हें बलुची मीर नामक नबाबाच्या ताब्यांत आहे. राजधानी खैरपूर.

१११ **कच्छप्रांत** याचा आकार चंद्रकोरीसारखा असून पावसाळ्यांत हें बेट बनतें. हें संस्थान रजपूत **राव** राजाच्या ताब्यांत असून उत्पन्न २५ लाख आहे. **लोक** दर्यावर्दी खलाशी व व्यापारी आहेत. **भाषा**—कच्छी. **धंदे**—रुप्यावरील नकशी काम व जरीचें काम. **प्राणी**—घोडे व उंट. ह्मशी, गाई, बैल परदेशीं जातात. **कच्छ** आखातांत मोतीं सांपडतात. **शहरें**:— १ **भूज** ( १९ ) राजधानी. येथें १८९८ सालीं धरणीकंप झाला होता. २ **मांडवी**—मुख्य बंदर असून येथें दीपगृह आहे.

११२ **काठेवाड** हें द्वीपकल्प आहे. **पर्वत**—गिरनार. येथें जैनांचीं सुंदर देवालयें आहेत. **जनावरें**:—सिंह, गाई, ह्मशी, घोडे. कारण गिरनार भागांत गवताचीं रानें फार आहेत. **संस्थानें** १८८ आहेत. जुनागड, भावनगर, नवानगर, गोंडल, ध्रांगध्रा, राजकोट हीं मुख्य संस्थानें आहेत. १ **राजकोट** ( ३६ ) हें उत्तम हवेचें ठिकाण असून येथें ‘ राजकुमार कॉलेज ’ व रेसिडेन्सी आहे. २ **जुनागड** ( ३३ ) हें गिरनार पर्वताजवळ आहे. ३ **भावनगर**—( ६० ) येथें कापसाचा व्यापार चालतो. ४ **द्वारका**— कृष्णाची राजधानी व हिंदूंचें क्षेत्र आहे. ५ **सोमनाथ**—येथील शिवालय गझनीच्या महंमदानें १०२४ त लुटून उध्वस्त केलें. ६ **पोरबंदर** येथें इमारती दगड सांपडतात. ७ **वेरावळ** हें बंदर आहे. ८ **जाफराबादेस**— उत्तम ह्मशी आहेत. ९ **खाराघोडा** येथें मीठ तयार होतें.

११३ **गुजराथ—उत्तरभागः—नद्या**—साबरमती, मही, नर्मदा, तापी. **सुपीकता**—मध्यभाग व पश्चिम भाग फारच सुपीक आहे. **विभाग**—ब्रिटिश जिल्हे, संस्थानें व एजन्सीज. **शहरें**—१ **अहमदाबाद** ( २७४ ) साबरमती कांठीं मुख्य शहर आहे. गुजराथचा सुभेदार अहंमद यानें वसविलें, ह्मणून यास अहमदाबाद हें नांव पडलें. येथें ६८ गिरण्या असून रेशमी, सुती व किनखापाचें कापड प्रसिद्ध आहे. येथील जुन्या इमारती व देवालयें प्रेक्षणीय आहेत. आगपेट्याचा कारखाना आहे. जैनांची वस्तीही बरीच आहे. २ **भडोच** ( ७० ) नर्मदेच्या मुखाशीं पूर्वी बंदर होतें. हल्लीं मुखांत गाळ

११९ **खानदेशचें सामान्य वर्णनः—प्रदेश**-उंचवट्याचा पण जमीन कसदार व सुपीक. **लोक**-सुखी. **पर्वत**-सातपुडा व सह्यादि. **डोंगर**—अजिंठा व सातमाळा. अजिंठा येथील कोरींव लेणीं फार सुंदर आहेत. त्यांतील रंगीत चित्रें दीड हजार वर्षांपूर्वीचीं असून रंग अद्याप जसेच्या तसेच आहेत. **नदी**-तापी. **हवा**-जास्त उष्ण. **धंदे**-गिरण्या व कारखाने. कापसाचें पीक फार असून कापसाच्या गिरण्या २०० आंदेत. **पाऊस**-पुरेसा पडतो. **लोक**-भिल्लांची वस्ती बरीच आहे.

१२० **पूर्वखानदेशः**--१ **प्रदेश**-दक्षिणोत्तर डोंगराळ. मधील तापीकांठ सपाट आहे. **उन्हाळींः**—चोपडें तालुक्यांत आहेत. **पीक**--कापूस. कापडाच्या व सरकी काढण्याच्या गिरण्या १३३ आहेत. **शहरें**:-१ **जळगांव** ( २४ ) जिल्ह्याचें ठाणें, व्यापाराची पेठ असून गिरण्या आहेत. २ **अजिंठा** कोरींव लेणीं आहेत. ३ **अंमळनेर**-( १७ ) गिरण्या आहेत. ४ **चाळीसगांव** ( १२ ) धुळें रेल्वे फांटा आहे. ५ **चोपडें**--उन्हाळीं आहेत. ६ **भुसावळ**--( २६ ) जंक्शन स्टेशन व रेल्वे कारखाना आहे.

१२१ **पश्चिम खानदेशः**--**पाऊस**--पुरेसा पडतो ह्मणून दुष्काळाचा संभव नसतो. **पीक**--कापूस. **शहरेंः**—१ **धुळें**-( ३१ ) पांझरा नदीच्या कांठीं असून जिल्ह्याचें ठाणें आहे. कापसाच्या गिरण्या आहेत. २ **तळोदें** येथें लांकडाचा व्यापार चालतो. **संस्थानें**:--डांगदेश व मेवासीप्रांत यांत भिल्लांची वस्ती फार आहे.

१२२ **नासिक जिल्हाः—पर्वत** सह्याद्रि. **डोंगर**:-चांदवडचा. **नदी**-गोदावरी. **पिकें**:-गहूं, बाजरी, तीळ, द्राक्षें, संत्रीं. **धंदे**--तांब्या पितळेचीं भांडीं करणें, विणणें. **शहरेंः—१ नासिक** ( ४३ ) गोदावरी कांठचें क्षेत्र, यात्रेचें ठिकाण, जिल्ह्याचें ठाणें, तांब्यापितळेच्या भांड्याविषयीं प्रसिद्ध आहे. **पंचवटी** येथें रामाचा वनवासांतील आश्रम होता. २ **इगतपुरी** ( ११ ) मोठें स्टेशन, थंड हवेचें ठिकाण आहे. ३ **त्र्यंबकेश्वर** ( ४ ) गोदावरीचें उगमस्थान, क्षेत्र आहे. ४ **भगूर** येथें गोऱ्या फौजेची छावणी आहे. ५ **मनमाड** ( १२ ) जंक्शन स्टेशन. ६ **येवलें** ( १४ ) रेशमी कद, पीतांबर, पागोटीं व जरीचें कापड यांविषयीं प्रसिद्ध आहे. ७ **मालेगांव** येथें किल्ला आहे. **संस्थान सुरगणा**. (उ० ५० हजार) हें कोळी देशमुख राजाच्या ताब्यांत आहे.

१२३ **पुणें शहर** ( १८० ) मुळेच्या कांठीं असून नं. ३ चें शहर. इलाख्याचें, मध्यभागाचें व जिल्ह्याचें मुख्य ठाणें असून इलाख्याचीं सेंट्रल ऑफिसें येथें आहेत. येथें पूर्वी पेशव्यांची राजधानी होती. विद्या, कला, चालरीत, शुद्ध व सभ्य भाषा, राजकारण यांचें हें माहेरघर आहे. शास्त्री, पंडित, व्यापारी, कारागीर, इनामदार, विद्वान व उद्योगी लोक यांचा मोठा भरणा येथें असल्यानें या शहरास मोठा मान आहे. हें मुंबई नजीक असल्यानें येथील **गणेशखिंडींतील** बंगल्यांत गव्हर्नरसाहेब पावसाळ्यांत चार महिने राहतात. येथें कापूस,रेशीम, भांडीं, तेल गाळणें, पिठाच्या गिरण्या, कलाबतू, साखर, छत्र्या, बीड, पैठण्या, पीतांबर, सुगंधी सामान, यांचे कारखाने आहेत. येथें १२ हायस्कुलें, ४ इंग्रजी कॉलेजें, ५ ट्रेनिंग कॉलेजें व इतर १०० शाळा आहेत. इ. स. ६०० च्या सुमारांत हें १०-१५ झोंपड्यांचें खेडें होतें. शिवाजी येथें राहात असे. पुढें पेशवाईत हें मोठें शहर बनलें. **खडकी**, घोरपडी व वानवडी येथें फौजेच्या छावण्या व तोफखाना आहे. पुण्याच्या आसपास बागाईत असून अंजीर, डाळिंब, पेरू, भाजीपाला यांचें चांगलें पीक येतें. **खडकवासलें** येथें धरण बांधून तेथून नळानें पुण्यास पाणी पुरवठा केला आहे. प्रेक्षणीय स्थलें:--अग्रिकल्चर कॉलेज, एंप्रेसगार्डन, कौन्सिल हॉल, चतुःशृंगी, डेक्कन कॉलेज, तुळशीबाग, न्यूइंग्लिशस्कूल, पर्वती, फर्ग्युसन कॉलेज, बंडगार्डन, बेलबाग, रेमार्केट, रेशमाची गिरणी, शनवारवाडा, हिंगणें बालिकाश्रम.

१२४ **पुणें जिल्हा**:--**डोंगर**--सह्याद्रीचे फांटे, **नद्या**--भीमा, निरा. **पिकें**:--ऊंस, बटाटे. **कारखाने**--कापसाचें कापड, लुगडीं, पीतांबर, जरीचें कापड, कागद, तांब्यापितळेचीं भांडीं हीं तयार होतात. **शहरें**:--१ **आळंदी** इंद्रायणी कांठीं असून येथें ज्ञानदेवाची समाधि आहे. २ **कार्लें**:--येथील कोरींव लेणीं भव्य आहेत. ३ **कोरेगांव**:-रणभूमी, जयस्तंभ आहे. ४ **जुन्नर** ( ७ ) येथें सुडाचे कागद होतात. जवळचा शिवनेरी किल्ला, शिवाजीचें जन्मस्थान होय. ५ **जेजुरी** [ २ ] येथें खंडोबाचें देवस्थान आहे. ६ **तळेगांव** येथें कांच कारखाना आहे. ७ **देहू** इंद्रायणी-कांठीं असून येथें तुकारामाची समाधि आहे. ८ **बारामती** [ १२ ] मोरोपंतांचें गांव. येथें रेशीमकांठीं धोतरजोडे चांगले होतात. साखरेचा कारखाना आहे. ९ **भीमाशंकर**

भीमेचें उगमस्थान. हें बाराज्योतिर्लिंगापैकीं एक आहे. १० **लोणावळें** ( ११ ) **खंडाळें**--हीं सह्याद्रीच्या माथ्यावर असल्यानें येथील हवा थंड आहे. बंगले फार आहेत. १२ **सिंहगड**--इतिहास प्रसिद्ध किल्ला. येथें तानाजीचें थडगें आहे. **संस्थान भोरः**--हें पंतसचिव नामक ब्राह्मण संस्थानिकाच्या ताब्यांत आहे. उत्पन्न ५ लाख आहे. प्रदेश डोंगराळ असून जंगल फार आहे. राजधानी **भोर** [ ४ ]. **तोरणा** हा किल्ला शिवाजीनें १६४६ त घेऊन स्वराज्याची मुहूर्तमेढ रोंविली.

१२५ **अहमदनगर जिल्हाः--डोंगर**--सह्याद्रीचे फांटे. **नद्या**-गोदावरी, भीमा, प्रवरा. **पिकें**--कापूस, गहूं. **धंदे**--विणकरी. **शहरेंः--अहमदनगर** [ ५० ] जिल्ह्याचें ठाणें. अहमद निजामशाह यानें हें शहर वसविलें, ह्मणून हें नांव पडलें. येथें भुइकोट किल्ला, चांदबिबीचा महाल व कापसाच्या गिरण्या आहेत. २ **कर्जत** येथें धान्याचा व्यापार चालतो. ३ **कोपरगांव** येथें पेशव्यांचा वाडा असून तींत राघोबादादा पेशवे राहात असत. येथें ऊंस फार पिकतो. ४ **खर्डे** [ ६ ] येथें भुइकोट किल्ला आहे. येथें १७९५ त निजाम व मराठे यांची लढाई झाली. ५ **पुणतांबें**--हें गोदावरी कांठचें क्षेत्र असून येथें चांगदेवाची समाधि आहे. ६ **श्रीगोंदें**--शेख महंदाचें गांव. शिंद्यांचा वाडा आहे. येथील घोडे उत्तम आहेत. ७ **संगमनेर** ( १३ ) अनंत फंदीचें गांव. येथील पितळेचीं भांडीं व लुगडीं प्रसिद्ध आहेत.

१२६ **सातारा जिल्हाः--डोंगर** सह्याद्रीचे फांटे. **नदी**--कृष्णा **पिकें**--ज्वारी, भुइमूग, हळद. **शहरेंः--१ सातारा** ( ३२ ) जिल्ह्याचें ठाणें मराठ्यांची राजधानी. शिवाजीचे वंशज येथेंच राहात असून त्यांस ६० हजार उत्पन्न आहे. **अजिमतारा** किल्ला नजकिच आहे. **साताराराेडवर** लोखंडी नांगर होतात. २ **औदुंबर** हें कृष्णा कांठचें क्षेत्र व दत्ताचें स्थान आहे. ३ **कऱ्हाड** कृष्णा-कोयना संगमावर असून येथें एक मनोरा आहे. ४ **तासगांव** येथील गणपतीचें स्थान व गोपूर प्रेक्षणीय आहे. ५ **परळी ऊर्फ सज्जनगड** येथें रामदास स्वामींची समाधि आहे. ६ **पांचगणी** ( २ ) थंड हवेचें ठिकाण. येथें साहेबांचे बंगले आहेत. ७ **महाबळेश्वर** ( ५ ) हें थंड हवेचें ठिकाण आहे. हें ४॥। हजार फूट उंच असल्यानें व झाडी फार असल्यानें येथील हवा उन्हाळ्यांत मजेदार थंड आहे. ह्मणून गव्हर्नरसाहेब,

युरोपियन लोक व श्रीमंत लोक येथें उन्हाळ्यांत राहातात. **नहर व मालकमपेठ** हीं गांवास नांवें आहेत. **क्षेत्र महाबळेश्वर** येथें कृष्णा, वेण्णा व कोयना यांचे उगम असल्यानें या स्थलास पवित्रता आली आहे. सभोंवार देखावा रमणीय आहे. ८ **वांई** [ १० ] कृष्णाकांठचें क्षेत्र.टुमदार शहर. घाट व देवळें प्रेक्षणीय आहेत. **धोम** येथें नरसिंहाचें स्थान आहे. **संस्थानें**--औंध व फलटण. १ **फलटण** हें संस्थान निंबाळकर नामक मराठे राजाच्या ताब्यांत आहे. उत्पन्न ४॥ लक्ष. २ **औंध** हें पंत प्रतिनिधि नांवाच्या ब्राह्मण राजाच्या ताब्यांत आहे. उत्पन्न २। लक्ष. **किर्लोस्करवाडी** येथें लोखंडाचा कारखाना आहे. **ओगलेवाडी** येथें कांच कारखाना आहे.

१२७ **सोलापूर जिल्हा**:--**नद्या**-भीमा, निरा, माण व सिना. **पिकें** ज्वारी व कापूस. **गिरण्या**-कापसाच्या २० आहेत. **शहरें**:--१ **सोलापूर** ( १२० ) जिल्ह्याचें ठाणें. येथें कापडाच्या ६ गिरण्या आहेत. लुगडीं चांगलीं होतात. तेथील जैनांचें देवालय प्रेक्षणीय आहे. २ **पंढरपूर** ( २५ ) भीमाकांठचें क्षेत्र. येथें विठोबाचें स्थान असून आषाढी, कार्तिकी व चैत्री एकादशीस मोठी यात्रा भरते. येथें भीमेचा प्रवाह चंद्रकोरीसारखा आहे, ह्मणून तीस चंद्रभागा असें ह्मणतात. ३ **बार्शी** ( २२ ) येथें गिरण्या पुष्कळ असून मोठा व्यापार चालतो. भगवंताचें स्थान प्रेक्षणीय आहे. **संस्थान अक्कलकोट** [ उ० ४ लाख ] हें भोंसले नांवाच्या मराठे राजाच्या ताब्यांत आहे.

१२८ **ठाणें जिल्हा**:--**उत्पन्न**-मिठागरांत २ लाख खंडी मीठ तयार होतें. **शहरें**:--१ **ठाणें**-( २३ ) जिल्ह्याचें ठाणें. साष्टी बेटांत आहे. येथील रेशमी कापड, पीतांबर व ठाणा क्राथ प्रसिद्ध आहे. २ **आगाशी** येथें सुकेळीं चांगलीं होतात. ३ **कल्याण** [ १८ ] जंक्शन स्टेशन असून व्यापार चालतो. ४ **कानेरी** येथें कोरींव लेणीं आहेत. ५ **भिवंडी** येथील लुगडीं, खण व पीतांबर प्रसिद्ध आहेत. ६ **वज्रेश्वरी** येथें वज्राबाईचें स्थान असून उष्णोदकाचें कुंड आहे. ७ **वसई** [ १० ] इतिहास प्रसिद्ध किल्ला. येथील केळीं नामांकित आहेत. ८ **वांद्रें** मोठें शहर असून येथें कसाईखाना आहे. ९ **साष्टी** हें बेट आहे. १० **व्याहाड, तुळशी व तान्सा** हे तलाव आहेत. **संस्थान जव्हार** ( उ० १॥. लाख ) यांतील मुलूख डोंगराळ व जंगली आहे. हें विक्रमशहा नांवाच्या कोळी राजांच्या ताब्यांत आहे.

१२९ **कुलाबा जिल्हाः–शहरें अलिबाग** [ ५ ] जिल्ह्याचें ठाणें, येथें बंदर, किल्ला व दीपस्तंभ आहे. येथें आंग्र्यांची राजधानी होती. २ **उरण** येथें मिठागर आहे. ३ **घारापुरी** हें बेट असून येथें कोरींव लेणीं आहेत. येथील शिवाची त्रिमुखी मूर्ति १२ हात उंच आहे. ४ **पनवेल**(९) ही व्यापारी पेठ असून येथें देशी औषधाचा कारखाना आहे. ५ **प्रतापगड** या किल्ल्यावर शिवाजीची कुलस्वामिनी भवानी देवी, हिचें देवालय आहे. ६ **पेण**--७ **महाड** ( ७ ) येथें भाताचा व्यापार चालतो. ८ **माथेरान**--थंड हवेचें ठिकाण. ९ **रायगड**--किल्ला, शिवाजीचें समाधिस्थान व थंड हवेचें ठिकाण आहे. १० **रेवदंडा**--हें बंदर आहे. **संस्थान जंजिरा** ( उ० ४॥ लाख ) हें. शिद्दी अबिसीनियन मुसलमान संस्थानिकाच्या ताब्यांत आहे. राजधानी–**मुरूड** (६).

१३० **रत्नागिरी जिल्हाः–शहरें**:--१ **रत्नागिरी** ( १९ ) जिल्ह्याचें ठाणें. येथील शिल्पशाळेंत लांकडी सामान चांगलें तयार होतें. २ **चिपळूण** [ ११ ] व्यापारी पेठ. येथें परशुरामाचें देवस्थान आहे. ३ **दापोली** येथील हवा नामी आहे. ४ **मालवण** (२२) व्यापारी पेठ आहे. ५ **राजापूर** (६) व्यापारी पेठ. येथील गंगास्थानचा झरा दोन तीन वर्षांनीं आकस्मिक वाहतो. शेजारीं उन्हाळेंही आहे. ६ **विजयदुर्ग** येथें गव्याच्या शिंगावरील नकशीकाम होतें. ७ **वेंगुर्लें** ( १९ ) हें उत्तम बंदर असून व्यापारी पेठ आहे. ८ **वेळास**—नाना फडणीसाची जन्मभूमि आहे. ९ **सिंधुदुर्ग** हा किल्ला आहे. **संस्थान सावंतवाडी** ( उ० ९ लक्ष ) हें भोंसले सरदेसाई नांवाच्या मराठे राजांच्या ताब्यांत आहे. राजधानी **सावंतवाडी** (८) येथें रंगीत लांकडी सामानाचा कारखाना आहे. गंजिफा होतात.

१३१ **मराठी संस्थानें १ कोल्हापूर** ( उ० ४० लक्ष ) हें शिवाजीच्या वंशजांच्या ताब्यांत आहे. येथील राजास ‘ छत्रपति महाराज ’ असा किताब आहे. राजधानी **कोल्हापूर** ( ५६ ). येथील अंबाबाईचें देवस्थान फार जुनें व प्रसिद्ध आहे. येथील नवा व जुना राजवाडा प्रेक्षणीय आहे. पोलिटिकल एजंट व रेसिडेंट येथेंच राहतो. कोल्हापूर संस्थानच्या अमलाखालीं विशाळगड, **कागल, बावडें, इचलकरंजी** इत्यादि लहान संस्थानें आहेत.

१३२ **दक्षिण महाराष्ट्रांतील जहागिरी**--१ सांगली, मिरज, मिरजमळा ऊर्फ बुधगांव, कुरुंदवाड, वडगांव ऊर्फ माधवपूर, जमखंडी, येथील संस्थानिक पटवर्धन नांवाचे ब्राह्मण आहेत. ७ **रामदुर्ग** हें भावे आडनांवाच्या ब्राह्मण राजाच्या ताब्यांत आहे. ८ **जत** ही जहागीर डफळे नांवाच्या मराठे राजाच्या ताब्यांत आहे. ९ **मुधोळ** हें घोरपडे नांवाच्या मराठे राजाच्या ताब्यांत आहे. १० **सावनूर** हें मुसलमान नबाबाच्या ताब्यांत आहे.

१३३ **बेळगांव जिल्हा**:--शहरें-१ **बेळगांव** (३६) जिल्ह्याचें ठाणें. याची उंची २५५० फूट असल्यानें येथील हवा थंड आहे, येथें किल्ला असून लष्करी छावणी आहे. २ **गोकाक** ( १० ) घटप्रभेच्या कांठीं. येथें धबधबा १७६ फूट उंच आहे. त्याच्या पाण्याच्या जोरावर वीज उत्पन्न करून तिच्या साह्यानें एक कापसाची गिरणी चालू आहे. येथें लांकडी रंगीत सामान तयार होतें. ३ **निपाणी** येथें तंबाकू, गूळ, मिरची यांचा मोठा व्यापार चालतो. ४ **संकेश्वर** येथें हिंदूंचे धर्मगुरु शंकराचार्य यांचा मठ आहे. ५ **सौंदत्ती** येथें यल्लंमाचें देवस्थान असून यात्रा भरते. **संस्थानें**:- मुधोळ व रामदुर्ग.

१३४ **धारवाड जिल्हा**:--यांतील जमीन फार सुपीक असून कापूस फार पिकतो. येथील सोन्याच्या खाणी हल्लीं बंद आहेत. **शहरें**:-१ **धारवाड** [ ३५ ] जिल्ह्याचें ठाणें. येथील चोळखण व तूप प्रसिद्ध आहे. २ **हुबळी** ( ६९ ) लोकसंख्या व व्यापार या दृष्टीनें जिल्ह्यांत हें पहिलें आहे. येथें जंक्शन स्टेशन असून रेल्वे कंपनीचा मोठा कारखाना आहे. **संस्थान सावनूर** ( उत्पन्न १ लाख ).

१३५ **कारवार जिल्हा**:**प्रदेश**--दऱ्याखोऱ्याचा व डोंगराळ आहे. **झाडी** फार असून जंगलांत सागवानाचें उत्पन्न बरेंच आहे. **हवा**:-पावसाळ्यांत पानें कुजून रोगट हवा झाली आहे. **पाऊस**--अतिशय पडतो. **शरावती** नदीचा **गिरसप्पा** येथें ८५० फूट उंचीचा धबधबा आहे. **शहरें**:-- १ **कारवार** [ १५ ] जिल्ह्याचें ठाणें. नं. ३ चें बंदर. २ **गोकर्ण महाबळेश्वर** [ ८ ] एक क्षेत्र आहे. ३ **शिरसी** ( ७ ) येथें वेलदोडे, सुपारी, मिरीं व चंदन यांचें उत्पन्न मोठें आहे.

१३६ **विजापूर जिल्हा**:--नद्या, पाऊस व झाडी कमी आहे. **हवा**--उष्ण, विषम, कोरडी व आरोग्यकारक आहे. **शहरें**:-१ **विजापूर** [ ३२ ] जिल्ह्याचें ठाणें. आदिलशाहीची राजधानी. इतिहास प्रसिद्ध इमारती—गोलघुमट, जुम्मामशीद, इब्राहिमरोजा, असारमहाल, मेहेतरमहाल, येथील 'मलिक इ मैदान' तोफ प्रेक्षणीय आहे. गोलघुमटाच्या गाभाऱ्यांत हळू शब्दही ७५ हातांवर स्पष्ट ऐकूं येतो. २ **इलकल** येथील रेशमी लुगडीं प्रसिद्ध आहेत. ३ **बदामी** येथें किल्ला व लेणीं आहेत. ४ **तालिकोट** रणभूमि. येथील गालिचे व सत्रंज्या प्रसिद्ध आहेत. **संस्थान** जत.

---

# हिंदुस्थानची सामान्य माहिती.

१३७ **हिंदुस्थान**:-आशिया खंडाच्या दक्षिणेस जीं तीन द्वीपकल्पें आहेत, त्यांतलि मधलें द्वीपकल्प हिंदुस्थान होय.

१३८**सीमा**:-**उत्तरेस**-हिंदुकुश, काराकोरम व हिमालय हे पर्वत असून त्या पलीकडे पूर्व तुर्कस्तान व तिबेट हे देश आहेत. **पूर्वेस**-आराकानचे व ब्रह्मदेशचे डोंगर, बंगालचा उपसागर. **दक्षिणेस**-हिंदी महासागर. **पश्चिमेस**-अरबी समुद्र, हाला व सुलेमान पर्वत. पलीकडे बलुचिस्तान व अफगाणिस्तान.

१३९ **सीमांचें महत्त्व**:-१ उत्तरेस पर्वतांचा वेढा व दक्षिणेस समुद्राचा वेढा आहे. २ त्यामुळें शत्रूस एकदम स्वारी करितां येत नाहीं. ३ समुद्र व पर्वत यामुळें पाऊस जास्त पडतो.

१४० **क्षेत्रफळ**-१७॥ लक्ष चौ. मैल. पैकीं संस्थानांत ६॥ लक्ष चौ. मैल. **लोकसंख्या**- ३२ कोटि. पैकीं संस्थानांत ७ कोटि. **लांबी**-दक्षिणोत्तर २ हजार मैल. **रुंदी**-पूर्वपश्चिम १९०० मैल आहे.

१४१ **किनारे** दोन आहेत. पूर्वकिनाऱ्यास **कारोमांडेलचा** किनारा व पश्चिम किनाऱ्यास **मलबारचा** किनारा ह्मणतात.

१४२ **आखातें**:-कच्छचें, खंबायतचें व मानारचें.

१४३ **सामुद्रधुनी**:-पाल्कची

न. ग्रा.

१४४ उपसागरः-बंगालचा उपसागर.

१४५ बेटें:-सिलोन (सिंहलद्वीप किंवा लंका), रामेश्वर, मानार, लखदीव, मालदीव, अंदमान व निकोबार. रामेश्वर व मानार यांस सांधणारा 'रामाचा सेतु' आहे.

१४६ भूशिरें:- मॉझ, केप कन्याकुमारी ऊर्फ कामेरिन, पालमीरस, कॅलमियर.

१४७ बंदरें:-पूर्वकिनाऱ्यावर-कलकत्ता, जगन्नाथपुरी, विजगापट्टण, पांदेचरी, मद्रास, मच्छलीपट्टण, नागापट्टण. पश्चिम किनाऱ्यावर-मंगळूर, कालिकत, गोवें, रत्नागिरी, मुंबई, पोरबंदर व कराची.

१४८ उंचवट्याचे प्रदेशः—१ हिमालयाचा डोंगराळ प्रदेश. २ दख्खनचें मैदान. सखल प्रदेशः—१ सिंधु व गंगाकांठचीं मैदानें. २ पूर्व-किनारा. ३ पश्चिमकिनारा.

१४९ स्वाभाविक विभागः—१हिमालयाचा डोंगराळ प्रदेश. २ दख्खनचें उंचवट्याचें मैदान. ३ पूर्वकिनाऱ्याचा सखल प्रदेश. ४ पश्चिम किनाऱ्याचा सखल प्रदेश. ५ सिंधु व गंगा कांठचीं सखल मैदानें.

१५० विंध्य पर्वताच्या उत्तरेकडील भागास उत्तर हिंदुस्थान किंवा हिंदुस्थान ह्मणतात. व दक्षिणेकडील भागास 'दख्खन' ह्मणतात.

१५१ राजकीय विभागः—राजधानी दिल्ली व सिमला. मुख्य अधिकारी गव्हर्नर जनरल इन्कौन्सिल किंवा व्हाइसराय. उत्पन्न २ अब्ज.

| ब्रिटिशविभाग. | राजधान्या. | संस्थानें (८००). | राजधान्या. |
|---|---|---|---|
| १ दिल्लीप्रांत | दिल्ली. | १ निजामचें राज्य. | हैद्राबाद. |
| २ पंजाब इलाखा | लाहोर. | २ हैसूर. | हैसूर. |
| ३ वायव्य सरहद्दीवरील प्रांत. | पेशावर. | ३ गायकवाडचें राज्य. | बडोदें. |
| ४ संयुक्त प्रांत. | अलाहाबाद. | ४ काश्मीर. | श्रीनगर. |
| ५ बहार ओरिसा प्रांत. | पाटणा. | ५ पंजाबमधील. | भावलपूर. |
| ६ बंगाल इलाखा. | कलकत्ता. | ६ संयुक्त प्रांतांतील. | रामपूर. |
| ७ आसाम प्रांत. | शिलांग. | ७ बहार मधील. | बस्तार. |
| ८ मध्यप्रांत व वऱ्हाड. | नागपूर. | ८ बंगालमधील. | कुचबिहार. |

| ब्रिटिशविभाग. | राजधान्या. | संस्थानें ( ८०० ). | राजधान्या. |
|---|---|---|---|
| ९ मुंबई इलाखा. | मुंबई. | ९ राजपुताना एजन्सी. | जोधपूर. |
| १० मद्रास इलाखा. | मद्रास. | १० सेंट्रल इंडिया एजन्सी. | ग्वाल्हेर. |
| ११ कुर्गप्रांत | मर्कारा. | ११ मध्यप्रांतांतील. | रायपूर. |
| १२ अजमीर-मेरवाडा. | अजमीर. | १२ मुंबई इ. तील. | कोल्हापूर. |
| १३ ब्रह्मदेश. | रंगून. | १३ मद्रास इ. तील. | त्रावणकोर. |
| १४ ब्रि. बलुचिस्तान. | क्वेटा. | १४ आसाममधील. | मणीपूर. |
| १५ अंदमान निकोबार. | पोर्टब्लेअर. | १५ वा. सरहद्दीवरील. | जलालाबाद. |
| १६ सिलोन. | कोलंबो. | १६ होळकरांचें राज्य. | इंदूर. |

१५२ **फ्रेंचांचा मुलूख**:—चंद्रनगर, यानान, कारिकल, पांडिचरी, माही. **राजधानी**:—पांडिचरी.

१५३ **पोर्तुगीजांचा** मुलूखः—दीव, दमण व गोवें.

१५४ **स्वतंत्र संस्थानें**:—**नेपाळ** राजधानी काटमांडू.
**भूतान** राजधानी पुनखा.

१५५ **पर्वत**:—हाला, सुलेमान, हिंदुकुश, काराकोरम, हिमालय, अरवली, विंध्य, सातपुडा, सह्याद्रि, पूर्वघाट, निलगिरी.

१५६ **शिखरें**:—**हिमालयांत** एव्हरेस्ट किंवा गौरीशंकर, कांचनगंगा, धवलगिरी, नंदादेवी व नंगापर्वत. **सुलेमानांत** तख्त इ सुलेमान. **कारकोरममध्यें** गॉडविन ऑस्टिन. **अरवलींत** अबू. **विंध्यमध्यें** कैमूर. **सातपुड्यांत** महादेव व पंचमडी. **सह्याद्रींत** मलयगिरी. **निलगिरींत** दोडाबेटा.

१५७ **खिंडी**:—बोलन, खैबर, पालघाट, काराकोरम, जेलापला.

१५८ **हिमालयाचें महत्व**:—१ हिमालयांत हिंदुस्थानांतील निम्या नद्यांचे उगम आहेत. २ हिमालयांतील बर्फापासून नद्यांना उन्हाळ्यांतही पूर येतात. ३ पाऊस फार पडतो. ४ हिमालयाच्या गाळापासून उत्तरहिंदुस्थान सुपीक झाला आहे. ५ उत्तरेकडील थंड वारे अडविले जातात. ६ शत्रुपासून संरक्षण होत आहे.

१५९ **पूर्वघाट व सह्याद्रि यांची तुलना**:—साम्य १ किनाऱ्याशीं समांतर आहेत. २ दोन्ही दक्षिणोत्तर आहेत. ३ दोहोंमुळें पाऊस पडतो.

भेदः-१ सह्याद्रि जास्त लांब व जास्त उंच आहे. २ पूर्वघाटास खिंडी व नागमोडी फार आहेत. ३ पूर्वघाट किनाऱ्यापासून जास्त लांब आहे. ४ सह्याद्रींत जास्त नद्यांचे उगम आहेत. त्या दोन्ही आंगांनीं वाहतात शिवाय जास्त लांब आहेत.

१६० **नद्यांचे वर्गः**-(अ) १ उत्तरार्धांतील नद्या. २ दक्षिणार्धांतील नद्या. (ब) १ सिंधु व तिला मिळणाऱ्या. २ गंगा व ब्रह्मपुत्रा. ३ दख्खनमधील पूर्ववाहिनी. ४ दख्खनमधील पश्चिमवाहिनी.

१६१ **मुख्य नद्याः**- सिंधु, गंगा, यमुना, ब्रह्मपुत्रा, महानदी, पेन्नार, पाळर, कावेरी, ताम्रपर्णी, शरावती, लुनी, साबरमती, मही, नर्मदा, तापी. गोदावरी, कृष्णा, शोणनद, गोमती, घोगरा, गंडकी, चंबळा, बटवा, सुरमा, [ २४ ते ४५ पहा. ]

१६२ **गंगा ऊर्फ भागीरथीः**-(१५००) ही नदी हिमालयांत गंगोत्रीजवळ उगम पावून संयुक्त प्रांत, बंगाल व वहार या प्रांतांतून वहात जाऊन पूर्वेकडे अनेक मुखांनीं बंगालच्या उपसागरास मिळते. **कांठीं गांवें**:-हरद्वार कानपूर, अलाहाबाद ऊर्फ प्रयाग, काशी ऊर्फ बनारस, पाटणा, मोंगीर, मुर्शिदाबाद, फरीदपूर, व कलकत्ता. **डा. मि. नद्याः**-रामगंगा, गोमती, घोगरा, गंडकी, भोगावती व कुशी. **उ. मि. नद्याः**-काली, यमुना, कर्मनाशा, शोणभद्र व फल्गु. **यमुनेस** चंबळा व बटवा ह्या नद्या मिळतात.

१६३ **गंगेचें महत्त्वः**-१ हिमनद्यांमुळें उन्हाळ्यांत पूर येतो. २ गंगेचें शुद्ध व पवित्र पाणी, संथ व भव्य प्रवाह, उगमाकडील सृष्टिसौंदर्य व शुद्ध हवा हीं अप्रतिम आहेत. ३ कांठचा प्रदेश अतिशय सुपीक आहे. ४ कालवे काढिले आहेत. ५ जलमार्ग उपयोगी आहे. अलाहाबादेपर्यंत जहाजें जातात. ६ हिंदु लोक हिला फार पवित्र मानितात. ७ गंगेच्या मुखाशीं गाळाचा व दाट झाडीचा जो प्रदेश आहे त्यास ' सुंदर बन ' असें ह्मणतात.

१६४ **ब्रह्मपुत्रा** ( १८०० ) ही नदी हिमालयांत मानस सरोवराजवळ उगम पावून आसाम व बंगाल या प्रांतांतून वहात जाऊन दक्षिणेकडे बंगालच्या उपसागरास मिळते. हिचा उजवा फांटा, गंगेच्या **पद्मा** नांवाच्या फांट्यास मिळतो. डाव्या फांट्यास **सुरमा** नदी मिळाल्यावर **मेघना** हें नांव

५

प्राप्त होतें. हा फांटा बंगालच्या उपसागरास मिळतो. हिच्या मुखांतून ८०० मैल जहाजें जातात. **कांठीं गांवें**:—रंगपूर, गोहत्ती, मेमनसिंग व डाका.

१६५ **महानदी** ( ५२० ) ही मध्यप्रांतांत छत्तिसगडाच्या मैदानांत उगम पावून आग्नेयीस बंगालच्या उपसागरास मिळते. हिला फार मोठे पूर येतात. **कांठीं गांवें**:—संबळपूर, कटक, जगन्नाथपुरी.

१६६ **उत्तर पेन्नार** ( ३५५ ) **पालर** ( २३० ) **दक्षिणपेन्नार** ( २४५ ) ह्या नद्या ह्मैसूरच्या पूर्वभागीं उगम पावून पूर्वेकडे बंगालच्या उपसागरास मिळतात.

१६७ **कावेरी** ( ४७० ) ही नदी सह्याद्रींत कुर्गप्रांतांत उगम पावून ह्मैसूर व मद्रास इलाखा यांतून वहात जाऊन अनेक मुखांनीं बंगालच्या उपसागरास मिळते. हिच्या उत्तर फांट्यास **कोलेरून** ह्मणतात. हिला दोन मोठे धबधबे आहेत. पैकीं **शिवसमुद्रमच्या** धबधब्याच्या जोरावर वीज उत्पन्न करून त्या योगानें **कोलार** येथील सोन्याच्या खाणी चालविल्या आहेत. **कांठीं गांवें**:—श्रीरंगपट्टण, ह्मैसूर, शिवसमुद्रम, त्रिचनापल्ली, तंजावर, कुंभकोणं.

१६८ **ताम्रपर्णी** [ ] ही नदी कार्डमम पर्वतांत उगम पावून मानारच्या आखातास मिळते.

१६९ **धबधबे**:—१ शरावती नदीचा **गिरसप्पा**. उंची ९५० फूट. २ कावेरीचा **शिवसमुद्रं**. उंची ३५० फूट. ३ घटप्रभेचा **गोकाक-जवळील** उंची १७६ फूट.

१७० **सरोवरें**:—[ १ ] गोड्या पाण्याचीं--काश्मीरांत वुलर. संयुक्त प्रांतांत **नैनिताल**. मद्रास इलाख्यांत **कोलेर**. [ २ ] खाऱ्या पाण्याचीं—राजपुतान्यांत **सांबर**. वऱ्हाडांत **लोणार**.

१७१ **हवामान** [ १ ] उत्तर गोलार्धांत उत्तरेकडे जों जों जावें, तों तों हवा कमी उष्ण होत जाते. [ २ ] दक्षिणेकडून उत्तरेकडे थंडीचें व विषमतेचें मान वाढत जातें. [ ३ ] समुद्रकिनाऱ्याची हवा सम असते. [ ४ ] **फार थंड**:--काश्मीर व हिमालयाचा प्रदेश. [ ५ ] **मध्यम उष्ण**—माळवा, मध्यहिंदुस्थान, दख्खन. ( ६ ) **उष्ण**—सिंध, पंजाब, राजपुताना,

गंगेचें खोरें, पूर्वपाश्चिम किनारे. [ ७ ] **विषमहवा**—सिंध, राजपुताना, पंजाब, माळवा, मध्यप्रांत, संयुक्तप्रांत, बहार. [ ८ ] **सम व दमट हवा**—पूर्वपाश्चिम किनारे, बंगाल, मद्रास.

१७२ **थंड हवेचीं ठिकाणें**:–सिमला, पेशावर, हरद्वार, नैनीताल, मसुरी, दार्जिलिंग, सिकिम, शिलांग, महाबळेश्वर, माथेरान, उटकमंड, पंचमडी, बंगलोर, कुन्नूर.

१७३ **पाऊस**:—( १ ) किनाऱ्यापासून दूर असलेल्या प्रदेशांत पाऊस कमी पडतो. ( २ ) समुद्राकडील मान्सून वाऱ्याच्या मार्गांत पर्वत असल्यास तेथें जास्त पाऊस पडतो. ( ३ ) पर्वतापलीकडे पाऊस कमी कमी होत जातो. ( ४ ) मान्सून वाऱ्याच्या मार्गांत उष्ण प्रदेश असल्यास तेथें पाऊस पडत नाहीं. ( ५ ) पश्चिम किनाऱ्यावर जून ते आक्टोबरपर्यंत पुष्कळ पाऊस पडतो. ( ६ ) मद्रासचा पूर्वभाग, निजामचें राज्य, मध्यप्रांत व पूर्वकिनारा यांत आक्टोबर ते जानेवारीपर्यंत पाऊस पडतो. [ ७ ] आसामांत चेरापुंजी व खाशी टेंकड्या येथें पाऊस अतिशय [ ८०० इंच ] पडतो. [ ८ ] सह्याद्रीवर पुष्कळ पडतो. [ ९ ] सिंध, पंजाब, राजपुताना यांत थोडा पडतो.

१७४ **सुपीकपणा**:–( १ ) गंगाकांठचा प्रदेश फारच सुपीक आहे. तेथें वर्षांतून तीन पिकें काढितात. ( २ ) सर्व नद्यांच्या उत्तर प्रवाहाचे प्रदेश चांगले सुपीक आहेत. ( ३ ) पंजाब सुपीक आहे.

१७५ **पिकें**:–**तांदूळ**–पूर्वपश्चिम किनारे, बंगाल व संयुक्तप्रांत. **गहूं**–उत्तर हिंदुस्थान. **ज्वारी बाजरी हरभरा** व **तूर**-तांदळाचा प्रदेश सोडून बाकीच्या प्रदेशांत. **कापूस**--मध्यप्रांत, वऱ्हाड, सिंध, गुजराथ, खानदेश. **चहा**–(उष्ण व दमट हवा, डोंगर उतरणीचा प्रदेश-४ हजार फुटांपर्यंत उंचीचा पाऊस भरपूर.)-आसाम, मद्रास. **ज्यूट** ( यापासून गोणपाट व पोतीं कारितात.) बंगाल. या पिकास फार कसदार जमीन लागते. **अफू**--माळवा व बहार. **नीळ**–बंगाल व बहार. **नारळ**--पूर्वपश्चिम किनारे. **सुपारी**--पश्चिमकिनारा व बंगाल. **आंबे**–सर्वत्र.

१७६ **प्राणी**:–**हत्ती** ( मोठीं जंगलें, उष्ण हवा ) हिमालयाचा पायथा हैसूर. **उंट** ( वाळवंटाचा प्रदेश ) सिंध, राजपुताना. **घोडे** (गव-

ताचीं रानें, थंड हवा ) पंजाब, काठेवाड. **सिंह**--गिरनारजंगलांत. **वाघ**--बंगाल व इतरत्र जंगल प्रदेशांत.

१७७ **खनिज संपत्ति--सोनें**--हैसूर. **लोखंड**--बंगाल, बहार, ओरिसा, मध्यप्रांत. **दगडीकोळसा**--बंगाल, बहार, आसाम, ओरिसा, मध्यप्रांत. **सोरा**--बहारमध्यें. **मीठ**--समुद्र किनारे. **सैंधव**--पंजाबांतील डोंगरांत. **संगमरवरी दगड**--राजपुताना. **मोतीं**--सिलोनजवळ.

१७८ **उद्योगधंदे व कारखाने--कलाकौशल्याचे पदार्थ**-श्रीनगर, अहमदाबाद, काशी, डाका, दिल्ली, मुर्शिदाबाद, लखनौ. **कापसाच्या गिरण्या**--अहमदाबाद, नागपूर, मुंबई. **गोणपाट**--बंगाल. **मलमल**--डाका पूर्वी प्रसिद्ध होतें. **लोंकरीचें कापड**--पंजाबांत धारिवाल. संयुक्त प्रांतांत कानपूर. **शाली**--काश्मीर. **कशीदा**, गालिचे **नकशीकाम**, ( धातूंवरील व हस्तिदंतावरील ), **भांडीं घडविणें** यांत हिंदुस्थान प्रसिद्ध आहे.

१७९ **कलाकौशल्याचे पदार्थ कोठें होतात?** ( १ ) सुपीक व सधन देश. ( २ ) हौशी श्रीमंत लोक. ( ३ ) मोठीं राज्यें. ( ४ ) प्रसिद्ध क्षेत्रें हीं जेथें आहेत तेथेंच तयार होतात.

१८० **हिंदुस्थानांतील धंदे कां बुडाले?** आधुनिक प्रचंड यंत्र सहाय्यानें होणारा माल; सुबक, कमी खर्चांत, कमी श्रमांत, थोड्या वेळांत व प्रचंड प्रमाणांत तयार होतो, त्यामुळें तो फारच स्वस्त दरानें विकतां येतो. युरोपांतून असा स्वस्त माल मोठ्या प्रमाणांत हिंदुस्थानांत येऊं लागल्यामुळें येथील हातकारागिरीचे कारखाने अजीबात बुडाले.

१८१ **रेल्वे--रुंदरुळाचे रस्ते** ( १ ) दि ग्रेट इंडियन पेनिन्शुला रेल्वे--मुंबई ते दिल्ली, जबलपूर, नागपूर व रायचूर पर्यंत. ( २ ) दि बॉंबे बडोदा अँड सेंट्रल इंडिया रेल्वे--मुंबई ते बडोदा. ( ३ ) नॉर्थ वेस्टर्न रेल्वे सिंध पंजाबमध्यें. ( ४ ) ईस्ट इंडियन रेल्वे--दिल्ली ते कलकत्ता. [ ५ ] औंध रोहिलखंड रेल्वे--संयुक्त प्रांतांत. [ ६ ] बंगाल नागपूर रेल्वे--कलकत्ता ते नागपूर. [ ७ ] साऊथ इंडियन रेल्वे व मद्रास रेल्वे--मद्रास इलाख्यांत. **अरुंद रुळाचे रस्ते**--[ १ ] मद्रास अँड सदर्न मराठा रेल्वे. [ २ ] साऊथ इंडियन रेल्वे.

१८२ **व्यापार-मुख्य बंदरें**-मुंबई, कलकत्ता, कराची, मद्रास, कोलंबो. **आयात माल** [ ३०० कोटि ]-९४ पहा. **निर्यात माल** [ २७५ कोटि ]-९५ पहा. शिवाय गोणपट, ज्यूट व चहा.

१८३ **लोकवस्तिः**—**हिंदु** ( २१ कोटि ). **मुसलमान** ( ७ कोटि ). **ख्रिस्ति** ( २५ लाख ). **शीख** ( ३० लाख ). **जैन** ( १२ लाख ). **बौद्ध** ( ३ लाख ). **पारशी** ( १ लाख ). **यहुदी** ( ।- लाख ). **डोंगरी** ( १ कोटि ). ९६ **पहा**. गुरखे, मराठे, मुसलमान, रजपूत, शीख हे शूर ह्मणून प्रसिद्ध आहेत. बंगाली लोक बुद्धिमान आहेत.

१८४ **भाषाः**—काश्मिरी, पंजाबी, नेपाळी, आसामी, सिंधी, मारवाडी, हिंदी, बिहारी, बंगाली कच्छी, गुजराथी, मराठी, उरिया, तेलगू, कानडी, मल्याळी, तामीळ, फारशी, उर्दू ऊर्फ हिंदुस्थानी.

१८५ **राज्यव्यवस्थाः**—( १०० ते १०७ पहा ). विलायतेंत हौस ऑफ लॉर्डस व हौस ऑफ कॉमन्स मिळून **पार्लमेंट सभा** आहे. त्याच्या प्रधान मंडळांत **स्टेट सेक्रेटरी** इन्कौन्सिल **ऑफ इंडिया** ह्मणून अधिकारी **इंडिया ऑफिस** मध्यें असतो. हिंदुस्थानचा कारभार १९१९ च्या, पार्लमेंटरी सुधारलेल्या इंडिया आक्टाप्रमाणें चालतो. **हिंदुस्थान सरकार** ऊर्फ **वरिष्ठ सरकार** हें व्हाइसराय व त्यांचें कार्यकारि मंडळ मिळून होतें. व्हाइसरायांच्या मदतीस **कौन्सिल ऑफ** स्टेट व लेजिस्लेटिव्ह असेंब्ली अशा दोन सभा आहेत.

१८६ **विशेष गोष्टी**:-**मोठा पर्वत**-हिमालय. **उंच खिंड**-काराकोरम **मोठ्या नद्या**-सिंधु व ब्रह्मपुत्रा. **सुंदर शहर**-जयपूर. **सुंदर इमारत**-आग्रा येथील ताजमहाल. वेरूळचीं लेणीं. **सुपीक प्रांत**-संयुक्त प्रांत. **नापीक प्रांत**-कच्छचें रण. **मोठें बंदर**-मुंबई. **मोठें शहर**-कलकत्ता. **राजधानी**-दिल्ली.

समाप्त.

# स्थलनामकोश.

१८७ पुढील स्थलें काय आहेत, कोणत्या जिल्ह्यांत आहेत व कशाकरितां प्रसिद्ध आहेत, तें सांगून मुंबई इलाख्याच्या नकाशांत दाखवा.

**अक्कलकोट**, अंकोला, अजिंठा प., अजिंठा श., अजिमतारा, अटक, अथणी, अप्परसिंध फ्रॉंटियर, अंबरनाथ, अंबा, अबू, अमरकंटक, अंमळनेर, अरबी स., अरवली, अलिबाग, अष्टे, **अहमदनगर**, **अहमदाबाद**, आग्रा, आगाशी, आळंदी, इगतपुरी, इचलकरंजी, इंद्रायणी, इंद्रावती, इंदूर, इलकल, ईदर, उत्तरभाग, उंबरगांव, उमरकोट, उमरखाडी, उरण, उल्हास, एस्. एम्. आर., ओगलेवाडी, औदुंबर, औंध, औरंगाबाद, कच्छ, कच्छ आ., कच्छरण, कणेरखेड, करवीर, **कराची**, कर्जत, कर्नाटक, कऱ्हाड, कल्याण, कळसूबाई, कागल, **काठेवाड**, काठेवाड ए., काठेवाड रे., कादवा, कानेरी, काबूल श. न., **कारवार**, कार्ले, किर्लोस्करवाडी, कुंडलिका, कुमठें, कुरुंदवाड ज्यु. सी., कुर्ले, **कुलाबा**, कृष्णा, कैमूर, कैलास, **कोंकण**, कोंकण प. पू., कोपरगांव, कोयना, कोरेगांव, कोल्हापूर, कोल्हापूर ए., कोल्हापूर स्टे. रे., केटा, खडकवासलें, खडकी, खंडाळें, खंबायत, आ., खर्डें, **खानदेश**, खानापूर, खाराघोडा, खारी, खिरथर, **खेडा**, खैबर, खैरपूर, गगनबावडा, गदग, गिरणा, गिरनार, गिरसप्पा, गुजराथ ए., गोकर्ण महाबळेश्वर, गोकाक, फॉल्स, गोंडल, गोदावरी, व्हॅलीरे, गोध्रा, गोवें, ग्रेट इं. पे. रे., ग्वाल्हेर, घटप्रभा, घारापुरी, घोड, घोडगेरी, घोघो, घोरपडी, चंद्रभागा, चांदवड, चाळीसगांव, चिकोडी, चिंचवड, चिनाब, चिपळूण, चेंबूर, चोपडें, जंजिरा, जत, जबलपूर, जमखंडी, जयगड, जव्हार, **जळगांव**, जाकोबाबाद, जाफराबाद, जांव, जांभूळ, जावळी, जी. आय. पी., जुनागड, जुन्नर, जेजुरी, जेहलम, **ठाणें**, डफळापूर, डाकूर. डांगदेश, डीसा, डोण, तळेगांव, तळोदें, तान्सा, तापी, व्हॅलीरे, ताम्रपर्णी, तालीकोट, तावरकट्टी, तासगांव, तुंगभद्रा, तुळशी, तोरणा, त्र्यंबकेश्वर, थर आणि पारकर, थळघाट, दमण, **दक्षिणभाग**, द. महाराष्ट्र, द. म. जहागिरी, दांटा, दापोली,

दाभोळ, दारणा, दिल्ली, दीव, देवगड, देवी होसूर, देश, दे. पूर्वपट्टी, दे. मध्यपट्टी, दे. प.पट्टी, देहू, दौंड, दौंड-मनमाड रे., दौलताबाद, द्वारका, धरमपूर, धारवाड, धुळें, धुळें चा.रे., धोम, ध्रांगध्रा, नगर, नवाबशाह, नरसोबावाडी, नर्मदा, नवानगर, नहर, नागोठाणें, नांदोद, नॉर्थ वे. रे., नासिक, निजामचें राज्य, निपाणी, निरा, निरा नरसिंगपूर, निर्मळ, नेरळ, नेवासें, पंचगंगा, पंचनदी, पंचमडी, पंचमहाल, पंचवटी, पंजाब, पंढरपूर, पणजी, पनवेल, परशुराम, परळ, परळी, पश्चिम खानदेश, पांचगणी, पांझरा, पालनपूर, पा. एजन्सी, पुणतांबें, पुणें, पुरंदर, पूर्णा, पूर्वखानदेश, पेण, पैठण, पैनगंगा, पोरबंदर, पोलादपूर, प्रतापगड, प्रवरा, प्राणहिता, फलटण, फैजपूर, फोंडाघाट, बंगाल उप., बडोदें, बदामी, बलुचिस्थान, बागलकोट, बाणकोट, बॉबे बडोदा रे., बारामती, बार्शी, बार्शी ला. रे., बावडें, बिकानेर, बियास, बी. बी. रे., बुधगांव, बेंगळूर, बेझवाडा, बेळगांव, बैतूल, बोरघाट, बोरी, बोलन, भगूर, भटकळ, भंडारदरा, भडोच, भाटघर, भावनगर, भिवंडी, भीमा, भीमाशंकर, भुसावळ, भूज, भोर, मंगळवेढें, मंगळूर, मंचर, मच्छलीपट्टण, मद्रास, मद्रास इ., मध्यप्रांत, मध्यभाग, मध्य हिं. सं., मनमाड, मलप्रभा, मलयगिरी, मलबार, महाड, महादेव, महाबळेश्वर, महाराष्ट्र, म. जहागिरी, मही, महीकांठा ए., मॉझ, मांझरा, मांडवी, माण, माथेरान, माधवपूर, मानस स., मारवाड, मार्केडी, मार्मगोंवा, मालकमपेठ, मालवण, मालेगांव, माहीम, माहुली, माळवा, मिथनकोट, मियानी, मिरज, मिरजमळा, मुचकुंदी, मुंढवें, मुधोळ, मुंबई, मुं. इ., मुं. भाग, मुं. सबर्बन, मुरूड, मुळा, मुठा, मेवासी, मोरवी, मोसम, म्हैसूर, येरवडा, येवलें, रत्नागिरी, राजकोट, राजपिंपळा, राजपुताना, रा. मा. रे., राजमहेंद्री, राजस्थान, राजापूर, रामदुर्ग, रायगड, रायचूर, रावी, रेवदंडा, रेवा, रेवाकांठा, रोहरी कालवा, लारखाना, लुनी, लोंढा, लोणावळें, लोणीकाळभोर, वज्राबाई [ वज्रेश्वरी ], वडगांव, वढवाण, वर्धा, वऱ्हाड, वसई, वांई, वांद्रें, वानवडी, वारणा, वाशिष्ठी, वांसदा, विजयदुर्ग, विजापूर, विंध्य, विशाळगड, विहाड, वेंगुर्लें, वेण्णा, वेरळा, वेरावळ, वेळास, वैजनाथ, वैतर्णा; वैनगंगा, व्याहाड, शंभूमहादेव, शरावती, शास्त्री, शाहापूर, शिका-

रपूर, शिरशी, **शिवनेरी**, श्रीगोंदें, श्रीवर्धन, संकेश्वर, सक्कर, संगमनेर, संगमेश्वर, सचीन, सज्जनगड, सतलज, सप्तशृंग, सदर्नमराठा, **सह्याद्रि**, सांगली, **सां. स्टे. रे.**, सातपुडा, सातमाळा, **सातारा**, सातारारोड, **सांद्रा**, साबरमती, सावंतवाडी, सावनूर, सावित्री, साष्टी, सिंध, सिंध पं. रे., **सिंधु**, सिंधुदुर्ग, सिना, **सिमला**, सिंहगड, सुरगणा, सुरत, सुरत एजन्सी, सुवर्णदुर्ग, सोमनाथ, सोमवडी, **सोलापूर**, सौंदत्ती, हडपसर, हारिश्चंद्रगड, हरिहर, हुर्णे, हाला, हिंडलगें, **हिंदुस्थान**, **हिमालय**, हिरण्यकेशी, हुटगी, हुबळी, हैद्राबाद सिंध, है. डेक्कन, होनावर, होळ, क्षेत्र महाबळेश्वर.

**अकोलें**, अथणी, आंबेगाव, इंडी, इंदापूर, एदलाबाद, एरंडोल, करजगी, कलघटगी, कळवण, कुंभार्ली, कोड, खटाव, खालापूर, खेड, गाणगापूर, गुहागर, चंदगड, जामखेड, जामनेर, जोधपूर, डहाणू, तिनै-घाट, दिंडोरी, नडियाद, नंदुरबार, नरगुंद, नवलगुंद, नवापूर, नांदगांव, निफाड, परसगड, पाचोरें, पाटण, पारनेर, पारोळें, पिंपळनेर, पेठ, बंकापूर, बागलाण, बारडोली, बिळगी, भडगांव, भीमथडी, भिलवडी, मंडणगड, माढें, माणगांव, मावळ, मुगद, मुंडर्गी, मुद्देबिहाळ, मुरगोड, मुरबाड, मुळशी, मोरवाडा, यल्लापूर, यावल, राणेबिन्नूर, राधनपूर, रावेर, राहुरी, रोण, रोहें, वाडें, वाळवें, विजयानगर, शहादें, शिरपूर, शिराळें, शिरूर, शेवगांव, संपगांव, साक्री, शिंदखेडें, शिंदगी, सिद्धापूर, सिन्नर, हल्याळ, हवेली, हानगल, हिंगणेंबुद्रुक, हुकेरी, हुनगुंद.

## १८८ विल्हेवारी नं. २ हिंदुस्थान विषयक.

**श्रीनगर**, श्रीरंगपट्टण, अजमीर, अंदमान, अफगाणिस्थान, अबू, अरबीसमुद्र, अरवली, अलाहाबाद, अहमदाबाद, आग्रा, आराकान, **आशिया**, आसाम, इंदूर, ईष्ट इंडियन रेल्वे, उटकमंड, उत्तर पेन्नार, उत्तर हिंदुस्थान, एव्हरेस्ट, ओरिसा, औंध रोहिलखंड रेल्वे, कच्छ, कच्छ आ., कच्छरण, कटक, कन्याकुमारी, कराची, कर्मनाशा, **कलकत्ता**, कॅलमियर, कांचनगंगा, काटमांडू, काठेवाड, कानपूर, कामोरीन, काराकोरम, कारिकल, कारोमांडेल कि. कार्डमम, कालिकत, काली, कावेरी, **काशी**, काश्मीर, कुचबिहार, कुन्नूर, कुंभकोण, कुर्गप्रांत, कुशी, कृष्णा, कैमूर, **कोलंबो**, कोलार, कोलेर, कोले-रून, कोल्हापूर, क्वेटा, खंबायत आ. खानदेश, खाशी टें., खैबर, **गंगा**,

गंगोत्री, गंडकी, गॉडविन ऑस्टिन, गायकवाडराज्य, गिरनार, **गिरसप्पा,** गुजराथ, गोकाक, गोदावरी, गोमती, गोवें, गोहत्ती, गौरीशंकर, ग्रे. इं. पे. रेल्वे, घटप्रभा, घोगरा, चंद्रनगर, चंबळा, **चेरापुंजी,** छत्तिसगड, जगन्नाथपुरी, जबलपूर, जयपूर, जलालाबाद, जेलापला, जोधपूर, डाका, तख्तइ सुलेमान, तंजावर, तापी, ताम्रपर्णी, तिबेट, तुर्कस्थान, त्रावणकोर, त्रिचनापल्ली, दाक्षिणपेन्नार, दख्खन, दमण, दार्जीलिंग, **दिल्ली,** दीव, दोडाबेटा, धवलगिरी, धारीवाल, नंगापर्वत, नंदादेवी, नर्मदा, नागपूर, नागापट्टण, नॉर्थवेस्टर्न रेल्वे, निकोबार, निजामराज्य, निलगिरी, नेपाळ, नैनीताल, पंचमडी, पंजाब, पन्ना, **पाटणा,** पांडिच्चरी ( पांदेचरी ), पालघाट, पालमीरस, पालर, पाल्कसा., पुनखा, पूर्वघाट, पूर्वतुर्कस्थान, पेन्नार, **पेशावर,** पोरबंदर, पोर्टब्लेअर, प्रयाग, फरीदपूर, फल्गु, बंगलोर, बंगाल, बंगाल उ०, बंगालनार्थ वे. रेल्वे, बटवा, **बडोदें,** बनारस, बलुचिस्थान, बस्तार, बहार, बॉबे बडोदा रेल्वे, बोलन, ब्रह्मदेश. ब्रह्मपुत्रा, ब्रि. बलुचिस्थान, भागीरथी, भावलपूर, भूतान, भोगावती, मंगळूर, मच्छलीपट्टण, मणीपूर, **मद्रास,** मद्रास इ., मद्रास रेल्वे, मध्यप्रांत, मध्यहिंदुस्थान, मर्कारा, मलबार कि०, मलयगिरी, मसुरी, महादेव, महानदी, महाबळेश्वर, मही, मांझ, माथेरान, **मानस स०,** मानार आ., मानारबेट, मारवाड, मालदीव, माही, माळवा, **मुंबई,** मुंबई इ., मुर्शिदाबाद, मेघना, मेमनसिंग, मेरवाडा, मोंगीर, **म्हैसूर,** यमुना, यानान, रंगपूर, रंगून, रत्नागिरी, राजपुताना, रामगंगा, रामपूर, रामाचा सेतु, रामेश्वरबेट, रायचूर, रायपूर, लंका, लखदीव, **लखनौ,** लाहोर, लुनी, लोणार, वऱ्हाड, वायव्य सरहद्दीवरील प्रांत, विजगापट्टण, विंध्य, वुलर, वेरूळ, शरावती, शिलांग, शिवसमुद्र, शोणभद्र ( शोणनद ), संबळपूर, संयुक्तप्रांत, सह्याद्रि, साऊथ इं. रेल्वे, सातपुडा, सांबर, साबरमती, सिकिम, सिंध, सिंधु, **सिमला,** सिलोन, ( सिंहलद्वीप ), सुंदरबन, सुरमा, सुलेमान, सेंट्रल इं. ए., हरद्वार, हाला, हिंदुकुश, हिंदुस्थान, हिमालय, हैदराबाद.

---

# पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या.

१ **अक्ष** ( आंस ) ह्मणजे पृथ्वी ज्या कल्पित रेषेभोंवतीं फिरते, त्यास तिचा ' आंस ' असें ह्मणतात. हा आंस उभा नसून कललेला आहे, तरी तो स्थिर व समांतर रेषेंत असतो.

२ **आखात** ह्मणजे समुद्राचा फांटा अरुंद असून तो जमिनींत दूरवर गेला असतो. त्यास ' आखात ' असें ह्मणतात.

३ **आखातें भूशिरें यांचे उपयोगः**—१ किनाऱ्यास खांडी असल्यानें दळणवळण करणें सोईचें असतें. २ तुफानाचा त्रास होत नाहीं. ३ चांगलीं बंदरें होतात. ४ दीपगृहें बांधितां येतात.

४ **आगगाड्यांचे** ( रेल्वेचे ) **उपयोगः**—१ मनुष्यें व माल यांची त्वरित व कमी खर्चांत ने आण होते. २ दुष्काळी प्रदेशांत धान्य--सामुग्री पाठवितां येते. ३ युद्धें, बंडें व दंगे या प्रसंगीं सैन्य पाठवितां येते. ४ भिन्न-प्रदेशांत दळणवळण वाढतें. ५ व्यापार वाढतो. ६ सुपीक व सपाट प्रदेशांतील रेल्वे जास्त नफ्याच्या असतात.

५ **आयात माल** ह्मणजे बाहेरून स्वदेशांत येणारा माल. उदा० घड्याळें, राकेल इत्यादि.

६ **इंडिया ऑफिस** ह्मणजे हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी यांचें लंडन येथलि ऑफीस.

७ **इंडिया कौन्सिल** ह्मणजे स्टेट सेक्रेटरी यांचें कौन्सिल.

८ **इलाखा** ह्मणजे अनेक कमिशनरी भाग मिळून झालेला जो प्रदेश त्यास ' इलाखा ' असें ह्मणतात. उ० मुंबई इलाखा.

९ **उगम** ह्मणजे नदी अगर ओढा जेथून उत्पन्न होतो, तें ठिकाण.

१० **उंचवट्याचा प्रदेश** ह्मणजे समुद्रसपाटीपेक्षां एक हजार फुटांहून जास्त उंच असलेला प्रदेश. उदा० सह्याद्रीचा पूर्वभाग.

११ **उत्तरध्रुव** ह्मणजे पृथ्वीच्या आंसाचें उत्तरेकडील टोंक.

१२ **उत्तरायण** ह्मणजे मकरसंक्रांतीपासून सहा महिन्यांचा काल.

१३ **उन्हाळें** ह्मणजे पृथ्वीच्या पोटांतील गंधक, सोरा इत्यादि ज्वालाग्राही पदार्थांच्या संयोगानें उष्णता उत्पन्न होऊन तिच्यामुळें कांहीं झऱ्यांचें पाणी ऊन असतें. अशा ऊन पाण्याच्या झऱ्यांस 'उन्हाळें' असें ह्मणतात. उन्हाळ्याचें पाणी ऊन असून त्यास गंधकाचा वास येतो. **ठाणें जि.** अकळोली. गणेशपुरी. **कुलाबा जि.** उन्हेरें, सोन, कुंडीवडी. **खानदेश**–उनबदेव, सुबनदेव, नजरदेव व वडलें. अंक २२ पहा.

१४ **उपसागर** ह्मणजे आखाताचें तोंड रुंद व पसरट असल्यास त्यास उपसागर असें ह्मणतात. उदा० बंगालचा उपसागर.

१५ **उपसागर व आखात यांत भेदः**–आखातापेक्षां उपसागर मोठा व रुंद असतो.

१६ **उष्ण हवा** ह्मणजे जास्त उष्णतामानाची हवा. उदा० सिंध, गुजराथ, देश यांतील हवा उष्ण आहे.

१७ **ऋतु** ह्मणजे पृथ्वीवर कमी जास्त वेळ सूर्यप्रकाश पडल्यानें दिवस लहान मोठे होतात. त्यामुळें हवामानांत भिन्न भिन्न बदल होतो. त्यास '**ऋतु**' असें ह्मणतात. उत्तरेस सूर्याचा प्रकाश फार वेळ पडला ह्मणजे तेथें उन्हाळा होतो. उलट त्याचवेळीं दक्षिणेकडे कमी वेळ प्रकाश पडतो. त्यामुळें तेथें हिंवाळा होतो.

१८ **ऋतूंचे प्रकार** उन्हाळा, पावसाळा व हिंवाळा. **सर्वऋतु** वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद्, हेमंत आणि शिशिर. **उन्हाळा** मार्च ते जून. **पावसाळा** जुलई ते आक्टोबर. **हिंवाळा**–नवंबर ते फेब्रुवारी ४।४ महिने असतो. **२१ मार्च** व **२३ सपटेंबर** रोजीं दिवस व रात्र हीं समसमान असतात.

१९ **ऋतुमानाप्रमाणें खेड्यांतील लोकांचीं कामेंः**–१ **उन्हाळ्यांत**–शेताचे बांध दुरुस्त करणें, जमीन नांगरून खत घालणें, भात जमीन राबानें भाजणें, झाडें तोडणें, शेणाच्या गोवऱ्या, मधाचीं पोळीं काढणें, करवंदें वगैरे फळें विकणें, शहरांत मोल मजुरीस जाणें. २ **पावसाळ्यांत**–भात जमीन पेरणें, रोपें उपटून लावणी करणें, बेनणी करणें, शेतें

नांगरणें, कुळव मारून खरीप पेरणें, रोपें वाढल्यावर कोळपणें, पिकें कापून सुडीं बांधून वाळविणें, रब्बिची मशागत करणें, शाळू जमीन तयार करून पेरणें. ३ **हिंवाळ्यांत** खळीं करणें, खरीप व शाळू यांची मळणी करणें, धान्य व कडबा घरीं आणणें, जास्त असलेले बाजारांत विकणें, सरकार धारा पोहोंचविणें, कर्ज भागविणें, घर दुरुस्ती करणें, लग्नकार्यें करणें.

२० **एक्झीक्युटिव्ह कौन्सिल** ह्मणजे अंमल बजावणी करणारें मंत्री मंडळ किंवा कार्यकारी कौन्सिल.

२१ **एजन्सी** ह्मणजे पोलिटिकल एजंटाच्या देखरेखी खालीं असणाऱ्या अनेक लहान संस्थानांच्या समूहास ‘ एजन्सी ’ असें ह्मणतात. उदा० काठेवाड एजन्सी, रेवाकांठा एजन्सी.

२२ **ओढा** ह्मणजे लहान नदी किंवा मोठा ओहोळ.

२३ **ओहोटी** ह्मणजे समुद्राचें पाणी ओसरणें.

२४ **ओहोळ** ह्मणजे जास्त पाऊस पडला असतां पाणी उतारावरून वहात जातें, त्यास ‘ओहोळ’ असें ह्मणतात.

२५ **कक्षा** ह्मणजे पृथ्वी, सूर्याभोंवतीं ज्या मार्गानें वार्षिक प्रदक्षिणा करिते, त्या मार्गास ‘ कक्षा ’ असें ह्मणतात.

२६ **कच्चा माल** ह्मणजे सृष्टीमध्यें आपोआप उत्पन्न होणारा माल. उदा० झाडें, कापूस, माती, अशोधित धातु इत्यादि.

२७ **कडा** ह्मणजे पर्वत किंवा डोंगर ह्याची एक बाजू तुटून भिंतीसारखी फार उंच झालेली असते; त्यास कडा असें ह्मणतात.

२८ **कमिशनरी भाग** ह्मणजे अनेक जिल्हे मिळून होणारा कमिशनरच्या ताब्यांतील प्रदेश. उदा० उत्तरभाग, मध्यभाग इत्यादि. स्थानिक स्वराज्य व मुलकी हीं कामें कमिशनरकडे असून विद्याखात्यावर ‘ एज्युकेशनल इन्स्पेक्टर ’ असतात.

२९ **कायदे कौन्सिल** ह्मणजे देशांत कायदे करणारी लोक नियुक्त संस्था किंवा मंडळ. यास ‘ लेजिस्लेटिव्ह कौन्सिल ’ असेंही ह्मणतात.

३० **कार्यकारी कौन्सिलः**—२० पहा.

३१ **कारखाना** ह्मणजे कच्च्या मालाचा पक्का माल तयार करणारी संस्था. उदा० गिरण्या, फॅक्टरी.

३२ **कारखाने कोठें निघतात ?** उत्तर:–१ कच्च्या मालाचा भरपूर पुरवठा. २ स्वस्त जळणाच्या पुरवठा. ३ खुष्कीचे व जलमार्ग यांची चांगली सोय. ४ वाहतुकीचीं साधनें. ५ श्रीमंत धाडशी व्यापारी. ६ कारागीर व मजूर. हीं जेथें आहेत, तेथें कारखाने निघतात.

३३ **कालवा** (कॅनाल) ह्मणजे नदी किंवा सरोवर ह्याचा पाट काढून तो जमिनींत दूरवर नेलेला असतो, त्यास 'कालवा' असें ह्मणतात. उदा० नीरा कॅनाल, कृष्णा कॅनाल.

३४ **कालवे, धरणें व पाट बंधारे यांचे उपयोग.** १ शेतीस व पिण्यास पाण्याचा पुरवठा होतो. २ नापीक प्रदेश सुपीक होतात. ३ दळणवळण व व्यापार चालतो.

३५ **किनारा** ह्मणजे समुद्राची कड. उदा० मलबार किनारा.

३६ **किल्ला** ह्मणजे शत्रूपासून संरक्षण होण्याकरितां सभोंवतीं तट बांधून तयार केलेल्या प्रदेशास 'किल्ला' असें ह्मणतात. किल्ल्याचे प्रकार तीन आहेत. १ डोंगरी किंवा गड. २ भुइकोट किंवा कोट. ३ जंजिरा किंवा दुर्ग.

१ **डोंगरी किल्ला** ह्मणजे डोंगर माथ्यावर कडा पाडून केलेला किल्ला.

२ **भुइकोट** ह्मणजे सपाट प्रदेशांत गांवठाणाभोंवतीं तट व बुरूज बांधून पलीकडे खंदक खणून तयार केलेला किल्ला.

३ **जंजिरा** ह्मणजे समुद्र किनाऱ्यावर तट बांधून तयार केलेला किल्ला.

३७ **किल्ल्याचे उपयोग**:–१ शत्रूपासून स्वदेशाचें संरक्षण होतें. २ खाजिना व बायका मुलें यांचें संरक्षण लढाईच्यावेळीं करितां येतें.

३८ **कोंकण** ह्मणजे सह्याद्रीच्या पश्चिमेकडील अरुंद पट्टी.

३९ **कोरडी हवा** ह्मणजे ज्या हवेंत वाफेचें प्रमाण कमी असतें, अशा हवेस 'कोरडी हवा' असें ह्मणतात. सिंध, महाराष्ट्र येथील हवा कोरडी आहे.

४० **कोरींव लेणीं** ह्मणजे डोंगर पोंखरून त्यांतील दगडांत कोरलेल्या इमारती, देवळें वगैरे नकशीदार कामास 'कोरींव लेणीं' असें ह्मणतात.

४१ **कौन्सिल** ह्मणजे अधिकारी मंडळ किंवा सभा.

४२ **खंड** ह्मणजे पृथ्वीवरील जमिनीचे जे मोठे विभाग केले आहेत त्यांस 'खंड' असें ह्मणतात. **पूर्वगोलार्धांत** आशिया, युरोप, आफ्रिका आणि आस्ट्रेलिया हे चार खंड आहेत. **पश्चिम गोलार्धांत** उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका आणि आस्ट्रेलेशिया हे तीन खंड आहेत. **पृथ्वीवर** $\frac{3}{4}$ भाग पाणी असून $\frac{1}{4}$ भाग जमीन आहे.

४३ **खंदक** ह्मणजे किल्ल्यासभोंवतीं खोल पण अरुंद अशी जमीन खणतात. त्यांत पावसाळ्यांत पाणी सांचतें. अशा खणलेल्या भागास 'खंदक' असें ह्मणतात.

४४ **खरीपाचीं पिकें** ह्मणजे पावसाळ्यांत होणारीं पिकें. उ० ज्वारी.

४५ **खाडी** ह्मणजे नदीचें मुख, समुद्राच्या भरतीचें पाणी आंत घेण्याजोगें रुंद असल्यास त्यास 'खाडी' असें ह्मणतात. उदा. वसईची खाडी.

४६ **खाड्यांचे उपयोगः**–१ जहाजांना आश्रयास निवाऱ्याचें स्थान मिळतें. २ गलबतें, जहाजें व होड्या दूरवर नेतां येतात. ३ खारे मासे मिळतात. ४ व्यापारास उपयोग होतो.

४७ **खाडी व नदीचें मुख यांत भेदः**–१ नदीच्या मुखापेक्षां खाडीचें मुख जास्त रुंद असतें. २ खाडीचें पाणी खारें असतें.

४८ **खाण** ह्मणजे धातु, दगडी कोळसा वगैरे खानिज पदार्थ, जमिनीच्या पोटांतून जेथून खणून काढतात त्या ठिकाणास 'खाण' असें ह्मणतात. उदा० कोलार गोल्ड फील्ड.

४९ **खातें** ह्मणजे बहुविध कारभारांतील एकेक बाब. उदा. शाळा खातें, मुलकी खातें, पी. डब्ल्यु. डी. इत्यादि.

५० **खिंड** ह्मणजे पर्वत व डोंगर यांच्यामधील सखल प्रदेशास 'खिंड' असें ह्मणतात. उदा० बोलन, खैबर.

नं.

५१ **खेडगांव** ह्मणजे जेथें १००० पेक्षां कमी मनुष्यवस्ती असते असें अगदीं लहान गांव.

५२ **खोरें** ह्मणजे डोंगरांच्या रांगांमध्यें जो खोलगट प्रदेश असतो, त्यास खिंड किंवा खोरें असें ह्मणतात.

५३ **खोरें** ( नदीचें ) ह्मणजे नद्यांमधील सखल व सपाट प्रदेश. उदा० गंगेचें खोरें, सिंधूचें खोरें.

५४ **गळिताचीं धान्यें** ह्मणजे ज्यापासून तेल काढतात अशीं धान्यें उदा० करडी, भुइमूग, एरंड, तीळ, जवस इत्यादि.

५५ **गारा** ह्मणजे पावसाचे थेंब खालीं येतांना फार थंडी लागून ते गोठले ह्मणजे त्यास ' गारा ' असें ह्मणतात.

५६ **गांव** ह्मणजे जेथें एक हजारपासून चार हजारपर्यंत मनुष्यवस्ती असतें, असें ठिकाण. उदा० कोरेगांव, गुहागर इत्यादि.

५७ **गांवठाण** ह्मणजे गांवांत मनुष्यवस्ती असलेली जी हद्द तीस ' गांवठाण ' असें ह्मणतात.

५८ **गुहा** ह्मणजे डोंगरांमध्यें खोलगट असलेल्या घळीस किंवा भेगेस ' गुहा ' असें ह्मणतात.

५९ **गोदी** ( डॉक ) ह्मणजे बंदरांत समुद्र किनाऱ्यास धक्का बांधून आगबोटी थांबविण्याकरितां जी जागा केलेली असते, तीस गोदी किंवा डॉक असें ह्मणतात. उदा० प्रिन्सेस डॉक.

६० **गोदीचे उपयोग**:–१ जहाजांवर माल चढवितां व उतरवितां येतो. २ आगबोटी सुरक्षित राहतात. ३ आगबोटी दुरस्त करितां येतात. ४ व्यापारास उपयोग होतो.

६१ **गोलार्ध** ह्मणजे पृथ्वीचे पूर्व पश्चिम मानलेले दोन समान भाग. उदा० पूर्व गोलार्ध व पश्चिम गोलार्ध.

६२ **ग्रामपंचायत** ह्मणजे गांवांतील तंटे बखेड्यांचा निकाल करण्याकरितां गांवच्या शिष्ट लोकांची जी सभा असते, तीस ' ग्राम पंचायत ' असें ह्मणतात.

६३ **घाट** ह्मणजे डोंगरावरून जाण्या येण्याकारितां जे उतरणीचे रस्ते तयार केलेले असतात त्यास 'घाट' असें ह्मणतात. उदा० थळघाट, बोरघाट इत्यादि.

६४ **घाटाचे उपयोगः**–१ डोंगराळ प्रदेशांत दळणवळण करणें सोईचें असतें. २ व्यापारास मदत होते.

६५ **घाट** (नदीचा) ह्मणजे नदी किनाऱ्यास दगडी पायऱ्या बांधून फरसबंदी कारितात, त्यास 'नदीचा घाट' असें ह्मणतात.

६६ **जंक्शन स्टेशन** ह्मणजे आगगाडीचे अनेक फांटे मिळणारें मोठें स्टेशन. उदा० पुणें, कल्याण, मनमाड इत्यादि.

६७ **जंगल** ह्मणजे मनुष्यवस्ती नसलेलें दाट झाडीचें अरण्य. खानदेश, कोंकण, कारवार यांत मोठालीं अरण्यें आहेत.

६८ **जंगलाचे उपयोगः**–१ दाट झाडीमुळें फार पाऊस पडतो.
२ पाणी जमिनींत मुरतें. ३ इमारतीचीं व जळाऊ लांकडें मिळतात.
४ हिरडा, लाख, डिंक, शिकीकाई वगैरे उभ्दिज्ज पदार्थ मिळतात.
५ वन्य पशूंची शिकार कारितां येते.

६९ **जहागिर** ह्मणजे सरदाराकडे तोडून दिलेला प्रदेश. उदा० जत, सांगली, इचलकरंजी वगैरे.

७० **जहागिर व संस्थान यांत भेदः**–१ संस्थानिकांचा दर्जा जहागिरदारापेक्षां मोठा असतो. २ संस्थानिकांस जास्त अधिकार असतात. ३ जहागिरदार हे सरदार ह्मणजे नौकर असतात.

७१ **जिल्हा** ह्मणजे अनेक तालुके मिळून होणारा राजकीय विभाग.

७२ **झरा** ह्मणजे जमिनींतून पाण्याचा प्रवाह आपोआप सुरू होतो; अशा प्रवाहास 'झरा' असें ह्मणतात.

७३ **टेंकडी** ह्मणजे जमिनीचा उंचवटा किंवा लहान डोंगर.

७४ **ट्राम** ह्मणजे विजेनें चालणारी गाडी.

७५ **डोंगर** ह्मणजे फार मोठी टेंकडी उदा० चांदवडचे डोंगर.

७६ **डोंगर व पर्वत यांचे उपयोगः**–१ वा[illegible] जातात. २ शिखरें ढगांना अडवून पाऊस पाडतात. ३ त्यामुळें नद्या व ओढे उत्पन्न होतात. ४ पावसानें डोंगर झिजून मैदानावर सुपीक जमिनी तयार होतात. ५ झाडी बरीच असते. ६ त्यामुळें इमारतीचें व जळाऊ लांकूड मिळतें. ७ डोंगराचा माथा उंच, सपाट व थंड असल्यास लोक उत्तम हवेसाठीं येऊन राहतात. ८ लोक कंटक होतात. ९ सरहद्द ठरविणें सोईचें असतें. १० शत्रु येण्यास प्रतिबंध होतो. ११ इमारतीचे दगड व खनिज संपत्ति मिळते. १२ हिरडा, शिकेकाई वगैरे उभ्दिज्ज पदार्थ मिळतात. १३ किल्ले बांधितां येतात.

७७ **डोह** ह्मणजे नदींत किंवा खाडींत जेथें पाणी फार खोल असतें, अशा जलाशयास ' डोह ' असें ह्मणतात.

७८ **तलाव** ( तळें ) ह्मणजे चारी बाजूंनीं जमीन असून मध्यें जो पाण्याचा मोठा सांठा असतो, त्यास तलाव किंवा तळें असें ह्मणतात. उदा० खडक वासले, व्याहाड, तुलसी, तान्सा, इत्यादि.

७९ **तलाव व सरोवर यांत भेदः**—१ तलावापेक्षां सरोवर फार मोठें असतें. २ तलाव क्वचित् बांधवितात पण सरोवर नैसर्गिक असतें. ३ तलावापेक्षां सरोवराचें पाणी फार खोल असतें.

८० **तालुका** ह्मणजे अनेक गांवें मिळून होणारा जिल्ह्याचा जो भाग, त्यास ' तालुका ' असें ह्मणतात. आपल्या जिल्ह्याचे तालुके सांगा.

८१ **तुफान** ह्मणजे प्रचंड वाऱ्यानें समुद्र खवळतो, तेव्हां त्यास ' तुफान ' असें ह्मणतात.

८२ **थंड हवा** ह्मणजे कमी उष्णतामानाची हवा. उंच प्रदेशावर हवा थंड असते. उदा० सह्याद्रीच्या माथ्याचा प्रदेश.

८३ **दमट हवा** ह्मणजे ज्या हवेंत वाफेचें प्रमाण जास्त असतें. अशा हवेस ' दमट हवा ' असें ह्मणतात. समुद्र किनाऱ्यास हवा दमट असते. उदा० कोंकण.

८४ **दरा** ( दरी ) ह्मणजे दोन डोंगरांमधील लहान व चिंचोळ्या भागास ' दरा ' असें ह्मणतात.

८५ **दरा खोरें खिंड व घाट यांत भेदः**—१ घाट हा डोंगरांतील रस्ता असून खिंड ही डोंगरांच्या रांगेमधील अरुंद व कडा तुटलेला रस्ता असतो. २ दरा अरुंद असून खोरें विस्तीर्ण असतें.

८६ **दरा खोरें व गुहा यांचे उपयोगः**—१ पाणी सांचून झरे उत्पन्न होतात. २ दाट झाडी उत्पन्न होते. ३ सृष्टिसौंदर्य पाहतां येतें.

८७ **दलदल** ह्मणजे नदीचें मुख व खाडी यांच्या कांठाला असलेली पाणथळ जागा. उदा० कच्छचें रण, सुंदरबन.

८८ **दहिंवर** ( दंव ) ह्मणजे सूर्य मावळल्यावर जमिनीलगतची हवा थंड होते. त्यामुळें तिजमधील वाफेचें पाणी होऊन त्याचे बारीक थेंब गवतांवर व पानांवर दिसतात. ह्या पाण्यास दंव किंवा दहिंवर असें ह्मणतात.

८९ **दक्षिण ध्रुव** ह्मणजे पृथ्वीच्या आंसाचें दक्षिणेकडील टोंक.

९० **दक्षिणायन** ह्मणजे कर्कसंक्रांतीपासून सहा महिन्यांचा काल.

९१ **दिवस किंवा उजेड** ह्मणजे सूर्याचा प्रकाश पृथ्वीच्या ज्या भागावर पडतो, तेथें दिवस असतो.

९२ **दिशा** ह्मणजे बाजू. १ मुख्य दिशा चार. पूर्व, पश्चिम, दक्षिण आणि उत्तर. २ उपदिशा चार. ईशान्य, आग्नेय, नैर्ऋत्य आणि वायव्य. ३ सूर्य उगवतो ती पूर्वदिशा. मावळतो ती पश्चिम दिशा. ४ नकाशांत वरची बाजू उत्तर. खालची दक्षिण. उजव्या हाताकडील पूर्व आणि डाव्या हाताकडील पश्चिम.

९३ **दिशांचे उपयोगः**—१ प्रदेशांतील वेगवेगळ्या स्थानांची जागा नक्की समजते. २ प्रवासास चांगला उपयोग होतो.

९४ **दीपगृह** ( लाइट हौस ) ह्मणजे समुद्र किनाऱ्यास कांहीं बंदरांत जहाजांना ‘ हें बंदर आहे ’ असें सुचविण्याकरितां, तसेंच खडक सुचविण्याकरितां खडकांवर; मनोऱ्याप्रमाणें उंच इमारत बांधून वर फिरता दिवा ठेवितात; त्यास ‘ दीपगृह ’ असें ह्मणतात.

९५ **दीपगृहाचे उपयोगः**—१ जलमार्गांत असलेल्या जहाजांना नक्की ठिकाण समजतें. २ जहाजांचे मार्ग चुकत नाहींत.

९६ **दुआब** ह्मणजे दोन नद्यांमधील प्रदेश. उदा० सिंधसागर दुआब.

3233

९७ **देवस्थान** ह्मणजे हिंदु देवालय व त्याच्या खर्चाकरितां तोडून दिलेलें उत्पन्न; यास ' देवस्थान ' असें ह्मणतात. उदा० पंढरपूर.

९८ **देश** ह्मणजे सह्याद्रीच्या पूर्वेकडील प्रदेश.

९९ **दैनंदिन गति** ह्मणजे पृथ्वी आपल्या आंसाभोंवतीं २४ तासांत १ प्रदक्षिणा करिते. ह्या गतीस ' दैनंदिन ' गति असें ह्मणतात.

१०० **द्वीपकल्प** ह्मणजे ज्या प्रदेशाच्या तिन्ही बाजूंकडून पाणी असून चौथी बाजू जमिनीशीं जोडलेली असते; त्यास द्वीपकल्प किंवा बहुतेक बेट असें ह्मणतात. उदा० काठेवाड, हिंदुस्थान.

१०१ **द्वीपकल्पें व भूशिरें यांत भेदः**—भूशिराचा पाण्यांत गेलेला भाग द्वीपकल्पापेक्षां अरुंद, लांबट व चिंचोळा असतो.

१०२ **धबधबा** ह्मणजे नदीचा प्रवाह डोंगरांतील उंच कड्यावरून एकदम खालीं कोसळतो; अशा प्रवाहास ' धबधबा ' असें ह्मणतात. उदा० गोकाक, गिरसप्पा.

१०३ **धबधब्याचे उपयोगः**—१ पाण्याच्या जोरावर वीज उत्पन्न करून तिच्या शक्तीनें गिरण्या व कारखाने चालवितां येतात. २ सृष्टिसौंदर्य प्रेक्षणीय असतें.

१०४ **धरण** ह्मणजे कांहीं नद्यांना धक्के बांधून पाणी अडवून ठेविलेलें असतें, त्यास ' धरण ' असें ह्मणतात. उदा० लोणावळें, गोकाक.

१०५ **धुकें** ह्मणजे मेघ जमिनीस लागून असले ह्मणजे त्यास ' धुकें ' असें ह्मणतात.

१०६ **ध्रुव** ह्मणजे पृथ्वीच्या आंसाचीं दोन्हीं टोंकें. उत्तर टोंकास उत्तरध्रुव व दक्षिण टोंकास दक्षिणध्रुव असें ह्मणतात.

१०७ **नकाशा** ह्मणजे पृथ्वीचा अगर पृथ्वीवरील कोणत्याही भागाचा कागदावर, प्रमाणांत काढलेल्या आकृतीस ' नकाशा ' असें ह्मणतात.

१०८ **नकाशाचे उपयोगः**—१ भूगोल विषयक यथार्थज्ञान होतें. २ न पाहिलेल्या प्रदेशाची बरीच कल्पना होते. ३ प्रवासास मदत होते.

१०९ **नदी** ह्मणजे पर्वत, डोंगर किंवा सरोवर यापासून गोड्या

पाण्याचा प्रवाह निघून तो उतार जमिनीकडे वहात जातो, त्यास 'नदी' असें ह्मणतात.

११० **नद्या, सरोवरें, धरणें व तलाव यांचे उपयोगः**– १ पाणी पिण्याच्या, धुण्याच्या व शेतीच्या उपयोगी पडतें. २ कालवे काढतां येतात. ३ नळानें शहरांत पाण्याचा पुरवठा करितां येतो. ४ जलमार्ग उपयोगी पडतो. ५ कांठांस गाळाच्या सुपीक जमिनी तयार होतात. ६ दाट झाडी तयार होते. ७ कांठीं गांवें वसविणें सोईचें असतें. ८ व्यापार चालतो. ९ सरहद्द ठरवितां येते, १० मासे मिळतात. ११ पाण्याच्या जोरावर कारखाने चालवितां येतात. १२ सृष्टिसौंदर्य प्रेक्षणीय असतें.

१११ **नद्यांची तुलना कशी करावी?** १ लांबी. २ वाहण्याची दिशा. ३ प्रवाहाचा जोर. ४ कालवे. ५ जलमार्ग. ६ पिकें. ७ उपयुक्तता. ८ उगम व मुख.

११२ **निरोगी हवा** ह्मणजे थंड, सम व कोरडी अशी हवा. नासिक, सातारा, पुणें व बेळगांव येथील हवा निरोगी आहे.

११३ **निर्यात माल** ह्मणजे परदेशीं जाणारा माल. उदा० कापूस, गहूं.

११४ **नोटिफाइड एरिया कमिटी** ह्मणजे मोठाल्या गांवांतील आरोग्य, शिक्षण या खात्यांची व्यवस्था, त्या गांवच्या लोकनियुक्त मंडळाकडे सोंपविलेली असते. अशा मंडळास 'नोटिफाइड एरिया कमेटी' असें ह्मणतात. अशा कमेट्या मुं. इ. त १२ आहेत.

११५ **पक्का माल** ह्मणजे कच्च्या मालापासून कृतीनें तयार केलेला उपयुक्त माल. उदा० कापड, भांडीं, साखर, सिगारेट इत्यादि.

११६ **पठार** ह्मणजे उंच मैदान किंवा डोंगरावरील सपाट मैदान.

११७ **पठाराचे उपयोगः**–१ हवा थंड व स्वच्छ असते. २ वसाहतीस उत्तम.

११८ **पर्जन्य मापक यंत्र** (रेनगेज) ह्मणजे पाऊस मोजण्याचें यंत्र. यावरून रोज पाऊस किती इंच पडला, हें समजतें.

११९ **पर्वत** ह्मणजे डोंगर फार मोठा व उंच असून तो लांबवर पसरलेला असल्यास, त्यास 'पर्वत' असें ह्मणतात.

१२० **पर्वतांच्या रांगा** ह्मणजे डोंगर किंवा पर्वत तळाशीं लागून असतात, त्यांस ' पर्वतांच्या रांगा ' असें ह्मणतात.

१२१ **पर्वतांची तुलना कशी करावी?** लांबी, रुंदी, उंची, दिशा, नद्यांचे उगम, त्यांच्या दिशा, खनिज पदार्थ, वनस्पति, प्राणी यांवरून तुलना करावी.

१२२ **पश्चिम गोलार्ध** ह्मणजे ज्यांत अमेरिका खंड येतें असा पृथ्वीचा पश्चिमेकडील गोलार्ध.

१२३ **पाणलोट** ह्मणजे ज्या उंच मैदानांतून पाणी चोहोंकडे जातें, त्यास ' पाणलोट ' असें ह्मणतात. उदा० सह्याद्रीचा माथा, हिमालय इत्यादि.

१२४ **पाण्याचीं रूपें**–गारा, दहिंवर ( दंव ), धुकें, पर्जन्य ( पाऊस ), बर्फ, मेघ ( ढग ), वाफ, हिम.

१२५ **पात्र** ( नदीचें ) ह्मणजे नदीच्या दोन्ही कडांमधील प्रवाहाचा भाग.

१२६ **पार्लमेंट** ह्मणजे ब्रिटिश साम्राज्याचा कारभार चालविणाऱ्या, लंडन येथील ' हौस ऑफ लॉर्डस ' व ' हौस ऑफ कॉमन्स ' ह्या सभा.

१२७ **पूर्वगोलार्ध** ह्मणजे ज्यांत आशिया, युरोप व आफ्रिका हे खंड येतात, असा पृथ्वीचा पूर्वेकडील गोलार्ध.

१२८ **पूल** ह्मणजे नदीवर किंवा रहदारीच्या रस्त्यावर कमानी उभारून त्यावरून जाण्यायेण्यास तयार केलेला रस्ता.

१२९ **पृथ्वी नारिंगासारखी गोल आहे, यास प्रमाणें**:— १ क्षितिज वर्तुळाकार दिसतें २ दूरचें झाड अगर जहाज यांचा शेंडा प्रथम दिसतो; नंतर खालचे भाग क्रमानें दिसतात. ३ जसजसें उंच जावें, तसतसा पृथ्वीचा जास्त वाटोळा भाग दिसतो. ४ चंद्रग्रहणीं पृथ्वीची छाया चंद्रावर वाटोळी पडते. ५ दिशा न बदलतां पृथ्वीप्रदक्षिणा करितां येते.

१३० **पृथ्वीचा** व्यास ८००० मैल असून घेर किंवा परिघ २५ हजार मैल आहे. सूर्य फिरत नाहीं. पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते. पृथ्वीच्या गति दोन आहेत. १ दैनंदिन ह्मणजे स्वतःभोंवतीं. २ वार्षिक ह्मणजे सूर्याभोंवतीं. दैनंदिन गतीमुळें दिवस व रात्र हीं एकसारखीं होत असतात. पृथ्वीस सूर्याभोंवतीं प्रदक्षिणा करण्यास ३६५ दि. ५ ता. ४८ मि. ४६ से. इतका काळ लागतो; त्या काळास ' वर्ष ' असें ह्मणतात. वार्षिकगतीमुळें ऋतु होतात.

१३१ **पोलिटिकल एजंट** ह्मणजे संस्थान किंवा एजन्सी यांत देखरेख ठेवणारा ब्रिटिश अंमलदार.

१३२ **प्रवाह** ह्मणजे नदीचा ओघ. याचे तीन भाग आहेत. १ पूर्व-प्रवाह ह्मणजे नदीच्या उगमाजवळचा डोंगराळ भाग. २ मध्यप्रवाह ह्मणजे मधील प्रवाह. ३ उत्तर प्रवाह ह्मणजे नदीच्या मुखाकडील भाग.

१३३ **प्रांतिक सरकार** ह्मणजे गव्हर्नर व त्यांचें कार्यकारी मंडळ.

१३४ **बंदर** ह्मणजे समुद्र किनाऱ्यास धक्का बांधून आगबोटी थांब-विण्याकरितां केलेली सोईची जागा. उदा० अपॉलोबंदर.

१३५ **बंदर व समुद्रकिनारा यांचे उपयोगः**—१ जलमार्गानें दळणवळण होऊन व्यापार वाढतो. २ जलमार्ग कमी खर्चाचा असतो. ३ जहाजें सुरक्षित राहतात. ४ मीठ व मासे मिळतात. ५ उत्तम बंदर हें व्यापाराचें मोठें केंद्र असतें.

१३६ **बेट** ह्मणजे सर्व बाजूंनीं पाणी असून मध्यें जमीन असते, त्यास ‘ बेट ’ असें ह्मणतात. उदा० सिलोन, मानार, अंदमान इ०

१३७ **बेटांचे उपयोगः**—१ बेटावरील लोक दर्यावर्दीपणांत हुशार होतात. २ दळणवळण व व्यापार वाढतो. ३ किल्ले व दीपगृहें बांधतां येतात. ४ शत्रूस प्रतिबंध होतो.

१३८ **बोगदा** ह्मणजे आगगाडी जाण्यायेण्याकरितां डोंगर आरपार पोंखरून जो रस्ता तयार करितात, त्यास ‘ बोगदा ’ असें ह्मणतात.

१३९ **भरती** ह्मणजे समुद्राचें पाणी चढतें, त्यास ‘भरती’ असें ह्मणतात.

१४० **भूप्रदेशाची तुलनाः**—प्रदेशाचें स्वरूप, आकार, क्षेत्र, पर्वत, नद्या, सुपीकपणा, उत्पन्न, धंदे, हवामान, पाऊस यांवरून करावी.

१४१ **भूशिर** ( भूशलाका किंवा केप ) ह्मणजे जमिनीचा चिंचोळा भाग समुद्रांत गेलेला असतो, त्याला ‘ भूशिर ’ असें ह्मणतात.

१४२ **मराठी जिल्हे** ह्मणजे ज्या जिल्ह्यांत मराठी भाषा चालते असे जिल्हे. मराठी जिल्हे दहा आहेत.

१४३ **महाल** ( पेटा ) ह्मणजे तालुका मोठा असल्यास त्याचा निराळा भाग करितात, त्यास महाल किंवा पेटा असें म्हणतात.

१४४ **महालकरी** म्हणजे महालावरील मुख्य अधिकारी.

१४५ **महासागर** म्हणजे पृथ्वीवरील खाऱ्या पाण्याचे ५ भाग मानिले आहेत; त्या प्रत्येकास ' महासागर ' असें म्हणतात. ते असेः–१ पॅसिफिक. २ अॅटलांटिक. ३ आर्क्टिक. ४ अंटार्टिक व ५ हिंदी महासागर.

१४६ **मान्सून वारे** म्हणजे निरनिराळ्या ऋतूंत नियमितपणें वाहणारे हंगामी वारे.

१४७ **मालाचे प्रकारः**–१ कच्चा व पक्का. २ आयात व निर्यात. ३ खनिज, उद्भिज्ज व प्राणिज.

१४८ **माळ** म्हणजे गांवठाणाबाहेरील मोकळा सपाट प्रदेश.

१४९ **मिठागर** म्हणजे मीठ तयार करण्याचा कारखाना. उरण, कुर्ले पेण व वसई येथें मिठागरें आहेत.

१५० **मुख** म्हणजे नदी ज्या ठिकाणीं समुद्रास किंवा सरोवरास मिळते, त्या जागेस ' नदीचें मुख ' असें म्हणतात.

१५१ **मृगजल** ह्मणजे सूर्याच्या प्रखर उष्णतेनें मैदानांतील जमीन व हवा तापून त्या ठिकाणीं ' नदी किंवा सरोवर ' आहे, असा भास होणें; ह्या चमत्कारास ' मृगजल ' असें ह्मणतात. मृगजल सिंधमध्यें फार दिसतें.

१५२ **मेघ** ( ढग ) ह्मणजे थंडीमुळें हवेंतील वाफेचे बारीक बारीक कण बनतात. अशा असंख्य कणांच्या समुदायास ' मेघ ' असें ह्मणतात.

१५३ **मेघ व वाफ यांत भेदः**—१ वाफ दिसत नाहीं पण मेघ दिसतात. २ मेघ उंच असतात. ३ वाफ ही वायुरूप आहे पण मेघ असंख्य कणांनीं बनतात. ४ दोन्हीं पाण्याचीं रूपें आहेत.

१५४ **मैदान** ह्मणजे सपाट जमिनीचा मोठा प्रदेश. किंवा दरा मोठा व सपाट असल्यास त्यास ' मैदान ' असें ह्मणतात.

१५५ **मैदानाचे उपयोगः**—१ गांवें वसवितां येतात. २ शेतकी करून धान्य पिकवितां येते.

१५६ **म्युनिसिपालिटी** ह्मणजे शहरची व्यवस्था पाहणारी कमेटी किंवा मंडळी. मुंबई इ० त १५६ म्यु० असून त्यांचें उत्पन्न २॥ कोटि आहे.

१५७ **रब्बीचीं पिकें** ह्मणजे थंडीच्या दिवसांत होणारीं पिकें. उदा० हरबरा, गहूं, मका, शाळू इत्यादि.

१५८ **राखीव खातीं** ( रिझर्व्हड् ) ह्मणजे सरकार स्वाधीन असलेलीं खातीं. उदा० मुलकी, लष्कर, पोलीस, इन्कमट्याक्स, जकात इत्यादि.

१५९ **राजकीय विभाग** ह्मणजे राज्य कारभाराच्या सोईकरितां सरकारानें देशाचे पाडलेले जे विभाग, त्यांस 'राजकीय विभाग' असें ह्मणतात.

१६० **रात्र** ह्मणजे सूर्याचा प्रकाश पृथ्वीच्या ज्या भागावर पडलेला नसतो, तेथें रात्र असते.

१६१ **रेल्वे** ह्मणजे लोखंडी रुळाचा आगगाड्या जाणारा रस्ता. रेल्वेचे ( आगगाड्यांचें ) उपयोग ४ पहा.

१६२ **रेसिडेंट** ह्मणजे मोठ्या संस्थानांत देखरेख करण्याकरितां ठेवलेला ब्रिटिश कामगार.

१६३ **रोगी हवा** ह्मणजे दलदलीच्या प्रदेशाची हवा. ठाणें, कारवार या जिल्ह्यांतील हवा रोगट आहे.

१६४ **लेजिस्लेटिव्ह् असेंब्ली** ह्मणजे वरिष्ठ कायदे कौन्सिल.

१६५ **लोकलबोर्ड** ह्मणजे जिल्ह्याच्या लोकल फंडाच्या उत्पन्नांतून आरोग्य, शिक्षण, दवाखाने, रस्ते, कालवे इत्यादि लोकहिताचीं कामें करणारी लोकनियुक्त मंडळी. प्रकार २. १ डिस्ट्रिक्ट ( जिल्हा ) लो. बो. २ तालुका लोकल बोर्ड.

१६६ **वरिष्ठ सरकार** किंवा हिंदुस्थान सरकार ह्मणजे व्हाइसराय व त्यांचें कार्यकारी कौन्सिल.

१६७ **वाफः**—सूर्याच्या उष्णतेनें समुद्र, नद्या व सरोवरें ह्यांतील पाण्याची वाफ होऊन ती हवेंत मिसळून जाते.

१६८ **विषम हवा** ह्मणजे उन्हाळ्यांत फार उष्णता व हिंवाळ्यांत फार थंडी असून उष्णतामानांत फार फरक पडतो, अशा हवेस 'विषम हवा' असें ह्मणतात. समुद्रापासून दूरच्या भूप्रदेशांत हवा विषम असते. उदा० सिंध, गुजराथ व महाराष्ट्र यांतील हवा विषम आहे.

१६९ **शहर** ह्मणजे ५ हजार पेक्षां जास्त वस्ती असलेलें मोठें गांव.

१७० **शहरचें महत्त्व सांगा.** १ शहरच्या आसपास सुपीक प्रदेश असतो. २ रहदारीचें केंद्रस्थान असतें. ३ गिरण्या, कारखाने व उद्योगधंदे चालतात. ४ मोटा व्यापार चालतो. ५ वस्ती वाढते.

१७१ **शिखर** ह्मणजे पर्वत किंवा डोंगर याच्या उंच माथ्यास शिखर असें ह्मणतात.

१७२ **सखल प्रदेश** ह्मणजे समुद्र सपाटीपेक्षां १००० फूटांहून उंच नसलेला प्रदेश. उदा० कोंकण, पूर्व किनारा, गंगेचें खोरें इत्यादि.

१७३ **संगम** ह्मणजे मोठ्या नदीला लहान नदी ज्या ठिकाणीं मिळते, त्या ठिकाणास ' संगम ' असें ह्मणतात.

१७४ **सम हवा** ह्मणजे उन्हाळ्यांत उष्णता व हिंवाळ्यांत थंडी बेताची असून उष्णतामानांत फारसा फरक पडत नाहीं; अशा हवेस ' सम हवा ' असें ह्मणतात. समुद्र किनाऱ्याजवळच्या प्रदेशाची हवा सम असते. उदा० कोंकण, काठेवाडचा किनारा यांतील हवा सम आहे.

१७५ **समुद्र** ह्मणजे खाऱ्या पाण्यानें भरलेल्या फार मोठ्या खळग्यास समुद्र असें ह्मणतात. उदा० अरबी समुद्र.

१७६ **समुद्राचें पाणी खारें कां ?** उत्तरः– नद्यांतून थोडा थोडा क्षारमय पदार्थ समुद्रांत येतो. व समुद्राच्या पाण्याची वाफ होऊन खारट गाळ तसाच सांचून राहतो. हजारों वर्षें असा क्रम चालल्यानें समुद्राचें पाणी खारट झालें आहे.

१७७ **समुद्र व जमीन यांतील विरोधः**— १ बेट उलट सरोवर. २ आखात–द्वीपकल्प. ३ खाडी–भूशिर. ४ सामुद्रधुनी–संयोगिभूमि.

१७८ **संयोगिभूमि** ह्मणजे दोन जमिनीस जोडणारा जो जमिनीचा अरुंद भाग, त्यास ' संयोगिभूमी ' असें ह्मणतात.

१७९ **सरोवर** ह्मणजे चोहोंबाजूंनीं जमीन असून मध्यें जो पाण्याचा

फार मोठा संचय असतो, अशा मोठ्या तळ्यास 'सरोवर' असें ह्मणतात. उदा० मानस सरोवर.

१८० **संस्थान** ह्मणजे मुख्य राजाच्या अंमलाखालीं व कांहीं अंशीं स्वतंत्र्य असणाऱ्या लहानशा मांडलिक राज्यास 'संस्थान' असें ह्मणतात. उदा० बडोदें, कोल्हापूर.

१८१ **सामुद्रधुनी** (संयोगिजल) ह्मणजे दोन समुद्रांस जोडणारा जो पाण्याचा अरुंद भाग, त्यास सामुद्रधुनी किंवा संयोगिजल असें ह्मणतात. उद० पाल्कची सामुद्रधुनी.

१८२ **सेक्रेटरी एट** ह्मणजे गव्हर्नर साहेबांच्या सेक्रेटरींचें मुंबई येथील सरकारी ऑफीस.

१८३ **सोपींव खातीं** ह्मणजे लोकनियुक्त दिवाणांच्या ताब्यांत दिलेलीं प्रांतिक सरकारचीं खातीं. उदा० आरोग्य, शिक्षण, शेतकी इत्यादि.

१८४ **स्केल** ह्मणजे मोठ्या प्रदेशाचा नकाशा, लहानशा कागदावर ज्या प्रमाणानें काढतात, त्या प्रमाणास 'स्केल' असें ह्मणतात.

१८५ **स्टेशन** ह्मणजे उतारू व माल चढण्या उतरण्याकरितां आगगाडी थांबण्याचें ठिकाण. उदा० बोरीबंदर स्टेशन.

१८६ **स्थानिक स्वराज्य** ह्मणजे एखाद्या प्रदेशाची अंतर्व्यवस्था तेथील लोकनियुक्त मंडळावर सोंपविलेली असते; अशा व्यवस्थेस 'स्थानिक स्वराज्य' असें ह्मणतात. उदा० डिस्ट्रिक्ट म्युनिसिपालिट्या, डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डें, ग्रामपंचायती, नोटिफाइड एरिया इत्यादि.

१८७ **स्वाभाविक विभाग** ह्मणजे एखाद्या प्रदेशाची उंची, जमिनींचें स्वरूप, हवामान, डोंगर, नदी अगर समुद्र किनारा यांनीं मर्यादित असा जो भूप्रदेश, त्यास 'स्वाभाविक विभाग' असें ह्मणतात.

१८८ **हवामान** ह्मणजे एखाद्या प्रदेशाचें सरासरी उष्णतामान. हवामानाचे प्रकार चार आहेत. १ उष्ण किंवा थंड. २ सम किंवा विषम. ३ [illegible] किंवा कोरडी. ४ रोगी किंवा निरोगी.

१८९ **हवामानाची तुलना कशी करावी?** उत्तरः— प्रदेशाचें स्वरूप, समुद्र सपाटीपासून उंची, दाक्षिणोत्तर अंतर, समुद्रसांनिध्य, वारे यांवरून करावी.

१९० **हिम** ह्मणज जास्त थंडीमुळें ढगांतून पिंजलेल्या कापसाप्रमाणें पाण्याचे विरल व शुभ्र थर भूपृष्ठावर पडतात, त्यास 'हिम' असें ह्मणतात. हिमालयावर हिम पडतें.

१९१ **हिम व बर्फ यांत भेदः**— १ बर्फ कठीण व घन असतें. पण हिम विरल व लोण्यासारखें असतें. २ हिम आकाशांतून पडतें तर बर्फ भूपृष्ठावरच तयार होतें.

१९२ **हिम नदी** ह्मणजे पर्वताच्या शिखरावर सांचलेलें बर्फ जेव्हां पर्वताच्या उतरणीवरून हळुहळु वाहूं लागतें, तेव्हां त्यास 'हिम नदी' असें ह्मणतात. **हिची गति** रोज २-४ फूटच असते. **ह्या नद्यांमुळें** सिंधु, गंगा, ब्रह्मपुत्रा यांना उन्हाळ्यांत मोठे पूर येतात.

१९३ **क्षितिज** ह्मणजे आपल्या सभोंवतीं आकाश, घुमटासारखें जमिनीला वर्तुल रेषेंत टेंकल्यासारखें दिसतें, त्यास 'क्षितिज' असें ह्मणतात.

१९४ **क्षेत्र** ह्मणजे नदीच्या कांठीं अगर संगमावर देवस्थान असलेल्या गांवास अगर पवित्रस्थलास 'क्षेत्र' असें ह्मणतात. उदा० नासिक.

शाळेंत चालू करून } नवीन धर्तीचीं शालेय पुस्तकें ! { झटपट क्लास सुधारा.

कमिशन भरपूर ! कमिशन भरपूर !!!

पोष्टानें मागवा. } पोष्ट व्ही. पी. नें मागविणेंच फायदेशीर ! { आजच लिहा.

मराठी चौथ्या इयत्तेकरितां

१ सुलभ भूवर्णन भाग १. किं. ०३.
२ प्रश्नहार व तोंडीहिशेब. किं. ०३.
३ महाराष्ट्राचा प्रश्नोत्तर इतिहास. किं. ०६.
४ सुलभ मराठी व्याकरण. किं. ०२.
५ फॅन्सी नोटबुकें. किं. ००३.

मराठी पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या इयत्तेकरितां—

६ जोडाक्षरयुक्त शब्द-संग्रह. किं. ०१.
७ सुलभ तोंडी हिशेब भाग १ व २. किं. ०१०६.
८ फॅन्सी नोटबुकें. किं. ००३.

शाळासंमेलनें व समारंभ यांकरितां—

९ मानाजीराव नाटक. किं. ०४.
१० ईशस्तवन-संग्रह. किं. ०१.

आजच घाऊक मागणी करा.

पत्ताः—केशव रामचंद्र कुलकर्णी आलासकर.
हेड्मास्तर, म्यु. मराठी शाळा नं. ३ बेळगांव. S. M. C.